रायगड, नवी मुंबई
**राम प्रहर**
◆ वर्ष १६ ◆ अंक २३९
www.ramprahar.com
रविवार, १७ मार्च २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

अंतरंग

म्हसळ्यात महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल/२
मुरूडचे नाराज शेकाप कार्यकर्ते राष्ट्रवादीत करणार प्रवेश/५
'आरसीबी'ची फायनलमध्ये धडक; दिल्लीशी भिडणार/८

# महासंग्रामाचा शंखनाद!

## ▪ लोकसभा निवडणुकीची आयोगाकडून घोषणा
## ▪ सात टप्प्यांमध्ये मतदान; ४ जूनला निकाल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**देशभरातील जनता गेल्या काही दिवसांपासून वाट पाहत असलेल्या लोकसभा निवडणुकीची घोषणा अखेर झाली. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी शनिवारी (दि. १६) देशातील या सर्वांत मोठ्या निवडणुकीची घोषणा करीत संपूर्ण कार्यक्रम जाहीर केला. लोकसभेच्या एकूण ५४३ जागांसाठी सात टप्प्यांत मतदान होणार असून निकाल ४ जून रोजी जाहीर होईल. निवडणुकीच्या घोषणेनंतर देशात आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे.**




**५४३** एकूण जागा | **९६.८ कोटी** एकूण मतदार | **१.८२ कोटी** नव मतदार

### देशातील मतदानाचे टप्पे

- पहिला टप्पा — १९ एप्रिल
- दुसरा टप्पा — २६ एप्रिल
- तिसरा टप्पा — ७ मे
- चौथा टप्पा — १३ मे
- पाचवा टप्पा — २० मे
- सहावा टप्पा — २५ मे
- सातवा टप्पा — १ जून

### मतदान केंद्रावर विविध सुविधा

अपंगांसाठी मतदान केंद्रावर विशेष सुविधा करण्यात आली आहे. अपंगांसाठी केंद्रांवर रॅम्पची व्यवस्था आहे. त्याचप्रमाणे गर्भवती महिलांसाठीही व्यवस्था असेल. याशिवाय प्रत्येक मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, शौचालय आणि व्हीलचेअरची व्यवस्था करण्यात येणार आहे. ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेल्या किंवा ४० टक्क्यांहून अधिक अपंगत्व असलेल्या मतदारांना फॉर्म १२ डी वितरित केला जाईल. त्यांना मतदान केंद्रावर जायचे नसेल, तर त्यांच्या घरी जाऊन त्यांचे मत नोंदवले जाईल.

### चार राज्यांची विधानसभा निवडणूकही जाहीर

केंद्रीय निवडणूक आयोगाने देशातील सार्वत्रिक लोकसभा निवडणुकीची घोषणा केली. यासोबतच चार राज्यांच्या विधानसभा निवडणुका कधी होणार याचीदेखील घोषणा या वेळी करण्यात आली. आंध्र प्रदेश, ओडिशा, अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीम या चार राज्यांच्या विधानसभांची मुदत जून २०२४मध्ये संपणार आहे. त्यामुळे या राज्यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम या वेळी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी जाहीर केला, तर जम्मू आणि काश्मीरची विधानसभा भंग झाली असून तेथे अतिरिक्त सुरक्षा लागणार आहे. त्यामुळे या ठिकाणी लोकसभा निवडणूक झाल्यानंतर निवडणूक घेण्यात येईल, असेही निवडणूक आयुक्तांनी स्पष्ट केले.

### ९७ कोटी मतदार, ५५ लाख ईव्हीएम

देशात नोंदणीकृत मतदारांची संख्या सुमारे ९७ कोटी आहे. १०.५ लाख मतदान केंद्र आहेत जिथे मतदान होणार आहे. त्यासाठी ५५ लाख ईव्हीएमचा वापर केला जाईल. या वेळी १.८ कोटी मतदार प्रथमच मतदान करणार असून २० ते १९ वयोगटातील मतदारांची संख्या १९.४७ कोटी आहे. देशात १२ राज्ये अशी आहेत जिथे महिला मतदारांची संख्या पुरुष मतदारांपेक्षा जास्त आहे.

### २७ ॲप्स आणि पोर्टल तयार

लोकसभा निवडणुकीसाठी २७ ॲप्स आणि पोर्टल तयार करण्यात आले आहेत. आचारसंहितेच्या उल्लंघनाची माहिती सी विजील ॲपद्वारे दिली जाऊ शकते. त्यावर तत्काळ कारवाई केली जाईल. निवडणुकीची तयारी सुमारे १.५ कोटी मतदान अधिकारी आणि सुरक्षा कर्मचारी कार्यक्षमतेने काम करतात. या वेळीही निवडणूक घेण्याची जबाबदारी याच लोकांच्या खांद्यावर असेल.

### रिक्त विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक

देशभरात बऱ्याच महिन्यांपासून रिक्त असलेल्या विधानसभा मतदारसंघांतील पोटनिवडणुकीचीही या वेळी घोषणा करण्यात आली आहे. देशातील एकूण २६ विधानसभा मतदारसंघांमध्ये पोटनिवडणूक घेण्यात येणार आहे. ज्या राज्यांमध्ये पोटनिवडणूक होणार आहे त्यामध्ये बिहार, त्रिपुरा, हरियाणा, कर्नाटक, महाराष्ट्र , गुजरात, झारखंड, उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश, राजस्थान, तामिळनाडू या राज्यांचा समावेश आहे. महाराष्ट्रातील अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे.

### महाराष्ट्रात मतदान कधी आणि कुठे?

- **पहिला टप्पा (१९ एप्रिल)** : रामटेक, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर.
- **दुसरा टप्पा (२६ एप्रिल)** : बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशिम, हिंगोली, नांदेड, परभणी.
- **तिसरा टप्पा (७ मे)** : रायगड, बारामती, धाराशीव, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर, हातकणंगले.
- **चौथा टप्पा (१३ मे)** : नंदूरबार, जळगाव, रावेर, जालना, छत्रपती संभाजीनगर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर, शिर्डी, बीड
- **पाचवा टप्पा (२० मे)** : धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे, मुंबईतील सहा मतदारसंघ.

**निवडणुकीदरम्यान कुठे गैरप्रकार सुरू असतील असे निदर्शनास आल्यास त्याचा फक्त एक फोटो काढून सी विजील ॲपवर टाका. तुमच्या मोबाईलच्या अक्षांश, रेखांशावरून लोकेशन ट्रॅक करून १०० मिनिटांत आमची टीम तिथे पोहचेल व कारवाई करेल. निवडणुकांमध्ये हिंसा होऊ न देण्याचा निर्धारही आम्ही केला आहे. केंद्रीय पोलीस दलाच्या तुकड्या तैनात केल्या जातील. जिल्हास्तरावर एक कंट्रोल रूम असेल. याशिवाय अन्य पद्धतीने निरीक्षण केले जाईल.**
**-राजीव कुमार, मुख्य निवडणूक आयुक्त**

# पनवेल महापालिकेला मिळणार पाताळगंगा नदीतून वाढीव पाणी

## ▪ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रस्तावास शासनाची मंजुरी





**पनवेल : नितीन देशमुख**

आमदार प्रशांत ठाकूर यांनी राज्य शासनाला पत्र देऊन पनवेल महानगरपालिकेला पाताळगंगा नदीतून घरगुती कारणासाठी वाढीव ३.६५ द.ल.घ.मी. पाणी देण्याची मागणी केली होती. त्या आरक्षण प्रस्तावास शासनाने मंजुरी दिली आहे. त्यामुळे पनवेलकरांच्या सन २०५१पर्यंतचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.

पनवेल शहराला दररोज २८ एमएलडी पाण्याची गरज आहे. त्यापैकी आप्पासाहेब वेदक (देहरंग) धरणातून आठ एमएलडी, एमआयडीसीकडून पाच एमएलडी आणि महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून १५ एमएलडी पाणी मिळते. नवी मुंबई विमानतळ, रेल्वे, औद्योगिक वसाहत व नवीन झालेल्या अटल सेतूमुळे मोठ्या प्रमाणात राहण्यासाठी पनवेलला पसंती दिली जात आहे. त्यामुळे पनवेल महापालिका हद्दीत मोठ्या प्रमाणात नागरी वसाहत वाढत आहे. महापालिकेचे स्वतःच्या मालकीचे मोठे धरण नसल्याने पालिका हद्दीतील वाढत्या लोकसंख्येला पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे.

पनवेल महापालिकेची सन २०५१पर्यंत लोकसंख्या ३५ लाख होईल असे गृहीत धरून त्या वेळी पाण्याची गरज वाढणार आहे. यासाठी पनवेल महापालिकेला जादा पाणी मिळण्याकरिता शासनाकडे प्रस्ताव पाठवण्यात आला होता. आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीवरून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृहात जलसंपदा खात्याचे अधिकारी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक, नगरविकास खात्याचे अधिकारी व महापालिका आयुक्त यांच्याबरोबर बैठक घेतली. याशिवाय जलसंपदा खात्याने कुंडलिका नदीतून पाणी पनवेलला द्यावे, असाही प्रस्ताव महापालिकेने पाठवला आहे. त्याची अधिसूचना लवकरच निघणार आहे.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेप्रमाणे पाताळगंगा नदीतून घरगुती कारणासाठी वाढीव ३.६५ द.ल.घ.मी. पाणी पनवेलला देण्याच्या प्रस्तावाला जलसंपदा विभागाने १४ मार्च रोजी मंजुरी दिली. त्यानुसार पनवेल महापालिकेला दररोज १० एमएलडी पाणी मिळणार आहे. त्यामुळे पालिका हद्दीतील पाण्याचा प्रश्न सुटणार आहे. याशिवाय न्हावा शेवा योजनाही लवकरच पूर्ण होणार असल्याने त्यातूनदेखील पाणी मिळणार असल्याने पनवेलकरांची पाण्याची चिंता मिटणार आहे. याबद्दल माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानले आहेत.



*पनवेलकरांना भेडसावणारा पाणीपुरवठ्याचा प्रश्न लक्षात घेता पर्यायी स्रोत निर्माण करणे गरजेचे असल्याने त्याबाबत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत महापालिका आयुक्त व माजी नगरसेवक यांची बैठक घेण्यात आली. पर्यायी स्रोत निर्माण करण्याचाच भाग म्हणून त्यांनी पाताळगंगा नदीवरील जलशुद्धीकरण प्रकल्पातून पनवेल महापालिकेला दररोज १० एमएलडी पाणी देण्याचा निर्णय घेतला. याबद्दल मी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व राज्य शासनाचे आभार मानतो.*
**-प्रशांत ठाकूर**, आमदार, पनवेल



*पनवेल महापालिकेला पाताळगंगा नदीतून वाढीव पाणी मिळणार असल्याने आज महापालिका हद्दीत जो पाण्याचा विस्कळीतपणा जाणवत होता, तो कमी होऊन नागरिकांना मुबलक पाणी मिळेल.*
**-गणेश देशमुख, आयुक्त, पनवेल महापालिका**



### सुप्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल भाजपमध्ये दाखल

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

सुप्रसिद्ध गायिका अनुराधा पौडवाल यांनी शनिवारी (दि.१६) भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. या वेळी त्यांनी जय श्रीरामचा नारा देत भाजपमध्ये प्रवेश करून आपल्याला आनंद झाल्याचे म्हटले आहे.

अनुराधा पौडवाल या प्रसिद्ध गायिका आहेत. त्यांची गाणी आजही लोकांच्या पसंतीस पडतात. विशेषतः यांची काही भक्तीगीते खूप लोकप्रिय आहेत. भाजप त्यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवणार का हे अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# पनवेलमध्ये पाच कोटी १५ लाखांच्या विकासकामांचा शुभारंभ

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते भूमिपूजन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख तथा पनवेलचे कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदारसंघातील नागरिकांना भेडसवणाऱ्या समस्या मार्गी लागून विविध सुविधांचा लाभ मिळत आहे. त्यानुसार पाच कोटी १५ लाख रुपयांच्या विकासकामांचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शनिवारी (दि.१६) झाले.

अर्थसंकल्प २०२२-२३मधील दोन कोटी ५० लाख रुपयांच्या निधीतून विचुंबे नवीन ब्रिज-विसपुते कॉलेज ते शिवकरपर्यंतचा रस्ता आणि दोन कोटी ५० लाख रुपयांच्या निधीतून विचुंबेमधील ज्ञानेश्वरी माऊली सोसायटीमार्गे उसर्लीपर्यंतचा रस्ता तसेच आमदार प्रशांत ठाकूर यांच्या १५ लाख रुपयांच्या निधीतून माया रेसिडेन्सी ते मानसी पार्कपर्यंत गटाराचे काम करण्यात येणार आहे.

याशिवाय देवद ग्रामपंचायतीच्या निधीतून ग्रामपंचायत कार्यालयाचे सुशोभीकरण, ग्रामपंचायतीच्या समोरील गार्डनचे सुशोभीकरण, गाढी नदीवर संरक्षण भिंत बांधणे आणि नवीन गणपती घाट बांधण्याच्या कामाचेही भूमिपूजन करण्यात आले. दरम्यान, या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी पोदीहून विचुंबे मार्गावर बांधण्यात येत असलेल्या पुलाच्या कामाची पाहणी करून आढावा घेतला तसेच आवश्यक त्या सूचना दिल्या.

विकासकामांच्या शुभारंभ कार्यक्रमास भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, अनुसूचित जाती सेलचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, **(पान २ वर..)**

# कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या शिक्षक, विद्यार्थ्यांची सीकेटी कॉलेजला भेट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे अग्रगण्य महाविद्यालय म्हणून ओळख असणारे सोलापूर विद्यापीठातील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागामधील शिक्षक व विद्यार्थ्यांनी जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीतील चांगू काना ठाकूर (सीकेटी) आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेजला (स्वायत्त) १५ व १६ मार्च रोजी भेट दिली. फॅकल्टी व स्टुडन्ट एक्सचेंज प्रोग्रॅम अंतर्गत ही भेट झाली. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या शिक्षक व विद्यार्थीकेंद्रित उपक्रमासाठी शुभेच्छा देत कौतुक केले.

### ▪ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा

यानंतर सीकेटी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एस.के.पाटील यांनी आपल्या मनोगतात महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास सांगून वेगवेगळ्या क्षेत्रांत मिळलेल्या उल्लेखनीय यशाचा मागोवा घेतला. त्याचबरोबर त्यांनी महाविद्यालयाच्या नवनवीन संकल्पना उपस्थितांसमोर मांडल्या तसेच इंग्रजी विभागाकडून आयोजित केलेल्या विद्यार्थी केंद्रित उपक्रमाबद्दल अभिनंदन केले.

सीकेटी कॉलेज इंग्रजी विभागाचे प्रमुख डॉ. राजेश येवले यांनी इंग्रजी विभागाच्या स्थापनेपासून केलेल्या प्रगतीचा आलेख विद्यार्थ्यांसमोर मांडला. त्याचबरोबर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या मार्गदर्शक तत्वानुसार विभागाकडून दिल्या जाणाऱ्या विषयांची माहिती दिली. डॉ. समाधान माने यांनी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाकडून राबविल्या जाणाऱ्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचा उल्लेख करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शैक्षणिक, सामाजिक कार्याबद्दल कौतुक केले व संस्थेस असणाऱ्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. **(पान २ वर..)**

### घंटागाडीचे लोकार्पण



**पनवेल : उरण विधानसभा मतदारसंघाचे कार्यतत्पर आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नाने पळस्पे ग्रामपंचायतीसाठी घंटागाडी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या घंटागाडीचे लोकार्पण भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या हस्ते आणि आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीत शनिवारी झाले. या वेळी गुळसुंदे जि.प. विभागीय अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, तालुका उपाध्यक्ष व कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी प्रभारी सरपंच विद्याधर जोशी, नांदगाव सरपंच मनोहर भोईर, कसळखंडचे माजी प्रभारी सरपंच अनिल पाटील, पळस्पे गाव अध्यक्ष विजय गवंडी, उपसरपंच अजय तेजे, समीर केणी, सज्जन वारके, दर्शन ठोंबरे, उमेश पाटील, दीपक दुर्गे, धीरज ओवळेकर, रवी शेळके, ग्रामसेवक समीर पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.**

# मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये सामान्य जनतेच्या हिताचे लोकाभिमुख निर्णय

## सगेसोयरे व्याख्येसंदर्भातील अधिसूचनेवरील चार लाख हरकतींची नोंद व छाननी पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य शासनाने गेल्या पावणे दोन वर्षांत आतापर्यंत घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकांमध्ये शेतकरी, कामगार, महिला, युवा, ज्येष्ठ नागरिक असे सामान्य जनतेच्या हिताचे लोकाभिमुख निर्णय घेतले आहेत. आज घेतलेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत देखील जनहिताचे निर्णय घेतले असून त्यामध्ये कापूस, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना भावांतर पद्धतीने लाभ देण्यासाठी चार हजार कोटींची तरतूद करण्यात आली आहे. सगेसोयरे व्याख्यासंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेवर हरकती व सूचनांची छाननीची कार्यवाही सुरू असून चार लाख हरकतींची नोंद व छाननी पुर्ण झाली आहे. येत्या चार महिन्यांत या संदर्भात कार्यवाही पूर्ण करण्यात येईल, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी (दि.१६) येथे पत्रकार परिषदेत सांगितले.



मंत्रिमंडळ बैठकीनंतर सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या पत्रकार परिषदेस मुख्यमंत्री शिंदे यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार, मंत्री सर्वश्री धनंजय मुंडे, दीपक केसरकर, संजय बनसोडे उपस्थित होते.

या वेळी मुख्यमंत्री शिंदे म्हणाले, आमच्या सरकारने पहिल्या दिवसापासून ते आजपर्यंत सामान्य नागरिकांच्या हिताचे निर्णय आतापर्यंत पावणे दोन वर्षांत सुमारे ५० ते ६० मंत्रिमंडळाच्या बैठका झाल्या आहेत. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्याची भूमिका शासनाची पहिल्यापासून आहे. त्यासाठी विशेष अधिवेशन घेऊन मराठा समाजाला १० टक्के आरक्षणाचा निर्णय घेतला. त्याची अंमलबजावणी देखील सुरू असून शासकीय पदभरतीमध्ये त्याचा मराठा समाजातील तरुणांना लाभ होत आहे.

राज्यात सगेसोयरे व्याख्येसंदर्भात प्रसिद्ध करण्यात आलेल्या अधिसूचनेवर हरकती व सूचनांची छाननीची कार्यवाही सुरू असून आजपर्यंत चार लाख हरकतींची नोंद व छाननी पूर्ण झाली आहे. या अधिसूचनेवर एकूण आठ लाख ४७ हजार एवढ्या हरकती आणि सूचना प्राप्त झाल्या आहेत. उर्वरित चार लाख ४७ हजार हरकतींची नोंदणी व छाननी करण्याची कार्यवाही सुरू असून त्याकरिता साधारणतः २५ ते ३० दिवसांचा कालावधी लागणार आहे.

सामाजिक न्याय विभाग, अन्न व नागरी पुरवठा विभाग, इतर मागास बहुजन कल्याण विभाग, दिव्यांग कल्याण विभाग या विभागांकडून या हरकतींची नोंदणी व छाननी या हरकतींची सार्वजनिक सुट्टीच्या दिवशीही कार्यालयात उपस्थित राहून केली जात आहे. आता हे कर्मचारीदेखील निवडणूक प्रक्रियेमध्ये व्यस्त असतील. त्यामुळे त्यांना अवधी लागेल. त्यानंतर अधिसूचनेची मसुदा अंतिम कररून विधी व न्याय विभागाची मान्यता घेऊन अंतिम अधिसूचना प्रसिद्ध करू, असेही

**शनिवारी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीतील संक्षिप्त निर्णय**

*राज्य शिखर संस्थेच्या कळंबोलीतील इमारतीसाठी शुल्क माफी, तात्पुरत्या स्वरूपातील ६४ वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियमित करणार, मालमत्ता विद्रूपीकरणासाठी आता एक वर्षाचा कारावास. दंडसुद्धा वाढविला; १३८ जलदगती न्यायालयांसाठी वाढीव खर्चाला मान्यता; संस्कृत, तेलुगू, बंगाली, गोर बंजारा साहित्य अकादमी स्थापणार; शासकीय, निमशासकीय जागांवर आता मोफत चित्रीकरण; विणकर समाजासाठी आर्थिक विकास महामंडळ, ५० कोटी भागभांडवल; पुण्यश्लोक अहिल्यादेवी महाराष्ट्र शेळी व मेंढी विकास महामंडळाच्या भाग भांडवलात भरीव वाढ; हाताने मैला उचलण्याच्या प्रथेचे उच्चाटन करणार, रोबोटिक स्वच्छता यंत्रे असलेली 'मॅनहोलकडून मशीनहोल'कडे योजना; संगणक गुन्हे तातडीने निकाली निघणार, सेमी ऑटोमेटेड प्रोसेसिंग प्रकल्प राबविणार; राज्य पोलीस दलात आर्टिफिशियल इंटेलिजन्सचा वापर करणार; ऑटो रिक्षा, टॅक्सी चालकांसाठी कल्याणकारी मंडळ, ५० कोटी अनुदान; भुलेश्वरची जागा जैन इंटरनॅशनल ऑर्गनायझेशनला जिमखान्यासाठी वाटप; वृद्ध साहित्यिक व कलाकारांना पाच हजार रुपये मानधन आदी.*

# रायगड जिल्ह्यात महसूल विभागाला २२ वाहने उपलब्ध



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्हा महसूल प्रशासनाचा कारभार अधिक गतिमान व्हावा यासाठी जिल्ह्यातील क्षेत्रीय अधिकारयांना २२ वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात पालकमंत्री उदय सामंत यांनी शनिवारी (दि. १६) या वाहनांच्या चाव्या सुपूर्द करून त्यांना हिरवा झेंडा दाखवला. या वेळी आमदार महेंद्र दळवी, जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, सर्व प्रांताधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

गतिमान प्रशासन आणि आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरण यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून दोन कोटी २६ लाख रुपये इतका निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. गतिमान प्रशासन ही राज्य सरकारची जी संकल्पना आहे ती प्रत्यक्षात अंमलात आणायची असेल, तर महसूल अधिकाऱ्यांना आणि पोलिसांना चांगल्या दर्जाची वाहने उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला. यात महसूल विभागाला २२, तर पोलीस विभागाला १३ वाहने उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

**"नवीन वाहने आल्यामुळे महसूल आणि पोलीस हे दोन्ही विभाग आगामी काळात अधिक गतिमान पद्धतीने कामकाज करतील आणि हे अधिकारी नियोजित ठिकाणी अपेक्षित वेळेत पोहचल्यास जनतेला न्याय मिळू शकेल.**

**-उदय सामंत, पालकमंत्री, रायगड**

## किरवली येथील गोदामाला भीषण आग

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील किरवली गावात असलेल्या डांबराच्या गोदामाला भीषण आग लागल्याची घटना शनिवारी (दि. १६) दुपारच्या सुमारास घडली आहे.



किरवली येथील डांबराच्या गोदामाला आग लाल्याची घेता घडली असून या आगीमुळे गोदामात ठेवण्यात आलेल्या डांबराच्या ड्रम जळून खाक झाले आहे. आगीची माहिती मिळताच सिडको अग्निशामक दलाचे जवान घटनास्थळी दाखल होत त्यांनी आग विझवण्यासाठीचे प्रयत्न सुरु केले. सुदैवाने या आगीच्या घटनेमध्ये कोणतीही जीवित हानी झाली नसली तरी मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

# रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय सांस्कृतिक कार्यक्रम

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागीय सांस्कृतिक कार्यक्रम शनिवारी (दि. १६) संस्थेच्या नवी मुंबई वाशी येथील मॉडर्न स्कूल येथे झाला. या वेळी प्रसिद्ध गायक संभाजी पाटील यांनी आपले विचार मांडले.

प्रतिवर्षी ९ मे ला सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीनिमित्त ७ व ८ मे रोजी संस्थेच्या पाचही विभागातून विविध संस्कृतिक कार्यक्रम सादर करून त्यांना आदरांजली वाहिली. त्यानिमित्त शनिवारी सांस्कृतिक कार्यक्रम निवडीची स्पर्धा झाली. या स्पर्धेत रायगड विभागातील् फुंडे, रिटघर, पडवळपाडा, पोलादपूर, पिरकोन, वावंजे, पळसपे, जासई, करंजा, नावडे, कामोठे, दापोली, उलवा, गव्हाण व वाशी येथील विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

या कार्यक्रमास प्रसिद्ध गायक संभाजी पाटील, रायगड विभागीय अधिकारी रोहिदास ठाकूर, सहाय्यक विभागीय अधिकारी शहाजी फडतरे, वाशी मॉडर्न स्कूलच्या प्राचार्या सुमित्रा भोसले, मराठी प्राथमिकचे मुख्याध्यापक रवींद्र वाघ, वरिष्ठ लेखनिक संतोष गुजर, वैभव गावंड यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.




## डॉ. अरुणकुमार भगत धर्मादाय रुग्णालयाच्या जिल्हास्तरीय समितीवर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



धर्मादाय रुग्णालयातील आरक्षित खाटा निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी पारदर्शक पद्धतीने उपलब्ध करून देण्याकरिता राज्य शासनाने समिती गठीत केली असून रायगड जिल्ह्याच्या समितीवर तज्ज्ञ डॉक्टर म्हणून पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अरुणकुमार भगत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

डॉ. भगत यांच्यासह रायगडातून डॉ. सुधीर भोळे यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. प्रत्येक धर्मादाय रुग्णालयाने त्यांच्या रुग्णालयातील एकूण कार्यान्वीत खाटांपैकी १० टक्के खाटा निर्धन रुग्णांवर मोफत उपचार करण्यासाठी आणि १० टक्के खाटा दुर्बल घटकांतील रुग्णांवर सवलतीच्या दराने उपचार करण्यासाठी राखून ठेवणे या रुग्णालयांना बंधनकारक आहे. त्या अनुषंगाने धर्मादाय रुग्णालयात निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांसाठी आरक्षित खाटा पारदर्शी पध्दतीने निर्धन व दुर्बल घटकांतील रुग्णांना उपलब्ध करून देण्यासाठी विधि व न्याय विभागाच्या संदर्भाने शासन निर्णयान्वये राज्यस्तरीय विशेष मदत कक्ष स्थापन करण्यात आला आहे. या राज्यस्तरीय विशेष मदत कक्षाला सहाय्य करण्यासाठी राज्यात जिल्हास्तरीय समिती पुनर्गठीत करण्यात आली आहे. त्यानुसार शासनाने गठीत केलेल्या समितीच्या अनुषंगाने रायगड जिल्हास्तरीय समितीवर वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टर म्हणून पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अरुणकुमार भगत यांची नियुक्ती करण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

# नमो चषक स्पर्धेचे बक्षीस वितरण

## गव्हाण विद्यालयात उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष रायगड जिल्हा भारतीय युवा मोर्चा यांच्या वतीने घेण्यात आलेल्या नमो चषक चित्रकला व वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्यांना नुकतेच पारितोषिक वितरण करण्यात आले. रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी वक्तृत्व व चित्रकला स्पर्धेमध्ये तब्बल १२ पारितोषिक प्राप्त करून अव्वल स्थान पटकावले.



विजेत्या स्पर्धकांना भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाच्या वतीने प्रशस्तीपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख रकमेची पारितोषिके वितरित करण्यात आली. विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पारितोषिक वितरण समारंभास रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य रवींद्र भोईर त्याचप्रमाणे ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे व सागर रंधवे तसेच ज्युनिअर कॉलेजचे उमेश पाटील, अपर्णा देवकुळे, शितलकुमार म्हात्रे, लेखनिक चंद्रकांत मढवी व दयानंद खारकर आणि विद्यार्थी उपस्थित होते.

विद्यालयाच्या महादेव ठाकूर सभागृहात शनिवारी (दि. १६) झालेल्या या पारितोषिक वितरण समारंभात विद्यालयाचे प्राचार्य गोवर्धन गोडगे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून वक्तृत्व व चित्रकला स्पर्धेमधील त्यांच्या यशाबरोबरच ज्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला त्या विद्यार्थ्यांचेही त्यांनी कौतुक केले तसेच यशाची कमान अशीच उत्तुंग ठेवण्याचे आवाहन करून त्यांना शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सागरकुमार रंधवे यांनी केले. स्पर्धेतील विद्यार्थ्यांना चित्रकला विभाग प्रमुख गणेश भोईर व वक्तृत्व विभाग प्रमुख सागर रंधवे व उज्वला म्हात्रे यांचे मार्गदर्शन लाभले.



पान १ वरुन

### पनवेलमध्ये पाच कोटी १५ लाखांच्या विकासकामांचा शुभारंभ

ओबीसी सेल जिल्हा सरचिटणीस दशरथ म्हात्रे, शिवकर ग्रामंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, विभागीय अध्यक्ष किशोर सुरते, युवा मोर्चा अध्यक्ष विवेक भोईर, विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच स्वाती पाटील, भाजप नेते अप्पा गायकवाड, अनिल भोईर, बी.डी.पाटील, भरत पाटील, अविनाश गायकवाड, चेतन सुरते, आनंद गोंधळी, विवेक भोईर, के.सी.पाटील, बळीराम पाटील, रवींद्र भोईर, चेतन भिंगारकर, किरण भोइर, राकेश भोईर, भरत पाटील, संजित भिंगारकर, राकेश मोरे, डी.के.भोईर, किरण भोईर, देवद ग्रामपंचायतीचे सरपंच विनोद वाघमारे, उपसरपंच विजय वाघमारे, वामन वाघमारे, निलेश वाघमारे, संदीप वाघमारे, कैलास वाघामरे, वासुदेव वाघमारे, संजय वाघमारे, राजू ठोकळ, उमेश वाघमारे, सचिन वाघमारे, उसर्ली ग्रामपंचायतीचे सरपंच अनिता भगत, मुकेश भगत, जितेंद्र भगत, मच्छिंद्र भगत, जयवंत भगत, संजय भगत, प्रमोद पाटील, नरेश भगत, राकेश भोईर, प्रवीण वाघमारे, कनकेश्वर रसाळ यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते ग्रामस्थ, ज्ञानेश्वर माऊली सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक उपस्थित होते.

### कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या शिक्षक, विद्यार्थ्यांची सीकेटी कॉलेजला भेट

डॉ. धनंजय साठे यांनी कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाकडून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०च्या मार्गदर्शक तत्त्वानुसार केलेल्या बदलांबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासाबरोबरच संशोधन केले पाहिजे, असे आवाहन केले.

इंग्रजी विभागाचे डॉ. सूर्यकांत परकाळे यांनी आपल्या मनोगतात रयत शिक्षण संस्था सातारा आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्था पनवेल यांच्या शैक्षणिक व सामाजिक देदीप्यमान कामगिरीवर प्रकाश टाकून विद्यार्थ्यांना इंग्रजी विभागाच्या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांची माहिती दिली. त्याचबरोबर त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून राबविण्यात येणाऱ्या वेगवेगळ्या उपक्रमांचा उल्लेख करून संस्थेकडून मिळणाऱ्या पाठबळाबद्दल आभार व्यक्त केले.

विद्यार्थ्यांनीसुद्धा या औपचारिक चर्चेत भाग घेतला, ज्यामधून पनवेल परिसरातील सामाजिक शैक्षणिक आणि सीकेटी महाविद्यालयात असणाऱ्या वेगवेगळ्या विद्यार्थीकेंद्रित सोयीसुविधांची माहिती देण्यात आली. त्याचबरोबर कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स या ठिकाणीसुद्धा भेट दिली.

या दोन दिवसीय फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्राममध्ये कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे प्रा.कुबेर गायकवाड, प्रा. सुहास शिंदे, सीकेटी महाविद्यालयाच्या इंग्रजी विभागाचे प्रा.अभिजीत हिरे, प्रा.रेणुका गणेश व प्रा.यशिका भगत तसेच दोन्ही महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन उपक्रम यशस्वी केला.

या विद्यार्थीकेंद्रित उपक्रमाचे संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हॉइस चेअरमन वाय.टी. देशमुख, सेक्रेटरी डॉ. एस.टी.गडदे यांनी विशेष कौतुक केले.





**अलिबाग : राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांना वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते मनोज टके, अ‍ॅड. श्रीकांत रावकर, प्रथमेश काळे, चेतन टके, ध्रुव सोष्टे, पवित्र पोलसानी, सिद्धेश काळे, केतन भोय, उमेर सांगडे, निलेश म्हात्रे, मोरेश्वर सगणे, मितेश मोरे आदींनी शुभेच्छा दिल्या.**

## म्हसळ्यात महिलेचा विनयभंग; गुन्हा दाखल

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा शहरा नजिकच्या गावात माहिलेचे अश्लील फोटो सोशल मिडीयाच्या इंस्टाग्रामवरने पाठवून विनयभंग केल्याची तक्रार म्हसळा पोलिसांनी दाखल केली. पोलिसांनी या प्रकाराचा गुन्हा नोंद केला आहे.

आरोपीने त्याचे वेगवेगळ्या तीन इंस्टाग्राम आयडीने महिलेच्या आयडीवर अश्लील फोटो वारंवार पाठविले. माहिलेकडेही अश्लील फोटोंची मागणी केली, पुढे जाऊन त्यांनी फोटो न दिल्यास उपलब्ध असणारे अश्लील फोटो म्हसळ्यातील संख्येने जास्त सहभागी असलेल्या सोशल मिडीयावरील गृपवर शेअर करण्याची धमकी संबंधीत फिर्यादीला दिल्याचे पोलीस सूत्रांनी सांगितले. या गुन्ह्याचा तपास श्रीवर्धनचे पोलीस निरीक्षक रिकामे करीत आहेत.

**दुखवटा**

### विश्वनाथ देशमुख



**कर्जत :** तालुक्यातील कोंदिवडे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद देशमुख यांचे वडील विश्वनाथ शामराव देशमुख यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांचे वय ७३ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, सरपंच प्रमोद, वकील प्रफुल्ल, प्राचार्य विश्वास, सूना, नातवंडे असा परिवार आहे.

## निवडक

### सुमन तोगरे यांना पुरस्कार



**उरण :** सुमन संग्राम तोगरे यांना २०२२-२३चा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे समाजसेविका पुरस्काराने गौरविण्यात आले. यासोबत प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते संग्राम तोगरे यांचेही सर्वच स्तरातून अभिनंदन केले जात आहे. पुरस्कारात शाल, भारतीय संविधान पुस्तक, साहित्य रत्न, लोकशाहीर, डॉ. अण्णाभाऊ साठे पदक, प्रमाण पत्र, फाइव्ह स्टार हॉटेलमध्ये खान-पान तसेच निवास, प्रवास खर्च आणि रोख रुपये २५,००० रुपयांचे मानधन देऊन गौरविण्यात आले.

### पनवेल परिसरात आढळला मृतदेह

**पनवेल :** परिसरामध्ये एका डोझी व्यक्तीचा मृतदेह सापडला आहे. त्याच्या नातेवाईकांचा शोध शहर पोलीस करीत आहेत. मयत व्यक्तीचे अंदाजे वय ६० ते ६५ वर्षे, रंग सावळा, उंची साडे पाच फुट, चेहरा उभट, अंगाने सडपातळ, डोक्यावर टक्कल पडलेले व बाजुचे केस पांढरे, दाढी मिशीचे केस पांढरे व बारीक, कपाळ मोठे, नाक सरळ, अंगात तपकिरी व काळा शर्ट व काळी फुल पॅन्ट व अंगावर भगवा गमछा असे. या व्यक्तीबाबत माहिती असल्यास त्यांनी शहर पोलीस ठाणे (०२२-२७४५२३३३) किंवा उपनिरीक्षक एस डब्ल्यू वायकर यांच्या संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पनवेलमध्ये पोलिसांचा रूटमार्च

## लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी तयारी



**पनवेल : वार्ताहर**

देशभरात लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजले आहे. या पार्श्वभूमीवर पनवेल शहर पोलिसांनी शहरामध्ये रूटमार्च काढला.

शनिवारी (दि. १६) पनवेल शहर पोलीस ठाणे येथून सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे, पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, पोलीस निरीक्षक प्रवीण भगत यांच्यासह आरपीएफचे तीन अधिकारी आणि २९ जवान, मुख्य ठिकाणी पोलीस ठाण्याचे अधिकारी अंमलदार आणि आरपीएफ टीम या रूटमार्चमध्ये सहभागी झाले होते.

पनवेल शहरातील विविध ठिकाणांहून हा रूटमार्च काढण्यात आला. त्यानंतर याची सांगता सावरकर चौक येथे करण्यात आली.

## दोन वर्षे बेपत्ता असलेली महिला अखेर सापडली

**पनवेल : वार्ताहर**

सलग दोन वर्षे बेपत्ता असलेल्या महिलेचा पनवेल शहर पोलिसांनी तांत्रिक तपासाच्या आधारे शोध घेऊन तिला तिच्या कुटुंबीयांकडे सुपूर्द केले आहे.

पनवेल शहर पोलीस ठाण्यात हद्दीतील एक ४० वर्षीय महिला २ मे २०२२ रोजी सुमारास कामाला जात आहे असे सांगून घरातून निघून गेली होती. ती घरी परत न आल्याने तिच्या आईने ती हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्या मार्गदशनाखाली सहाय्यक निरीक्षक प्रकाश पवार, हवालदार अमोल पाटील, नाई मिथुन भोसले, पोकॉ विशाल दुधे यांच्या पथकाने सदर महिलेचा गुप्त बातमीदार तसेच तांत्रिक तपास सुरू केला. या वेळी ती डोंबिवली येथे असल्या बाबत माहिती मिळताच तिचा डोंबिवली परिसरात शोध घेऊन तिला ताब्यात घेतले व पोलीस ठाणे येथे आणल्यानंतर ती तिच्या आजारपणाला कंटाळून घरातून निघून गेली असल्याबाबतचे तिने सांगितले. त्यानुसार तिचा सविस्तर जबाब नोंद केला आहे. त्यानंतर सदर महिलेला तिच्या आईच्या व बहिणीच्या ताब्यात सुखरूप देण्यात आले आहे.

## धोकादायकपणे उभ्या कंटेनरवर कारवाई

**पनवेल :** सार्वजनिक रस्त्यावर धोकादायक स्थितीत कंटेनर उभा केल्या प्रकरणी तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे. अरशर्द अली अख्तर हुसैन खान या कंटेनर चालकाने त्याच्या ताब्यातील कंटेनर पनवेल-खोपोली हायवेवरील एल एन डब्ल्यू गोडाऊनच्या समोर सार्वजनिक रस्त्यावर धोकादायक स्थितीत कंटेनर उभा केल्या प्रकरणी त्याच्यावर पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे.

## 'बेटी बचाओ बेटी पढाओ'; टेम्पोवाला करतोय जनजागृती



**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील उरण शहरातील पालवी हॉस्पिटलसमोर राहणारे सामाजिक कार्यकर्ते टेम्पोवाले दिलीप मदन जाधव हे आपल्या टेम्पोवर बेटी बचाओ बेटी पढोओ असे पेंट करून गेली १२ वर्षांपासून उरण तालुक्यात जनजागृती करीत आहेत.

थोर निरुपणकार डॉ. नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे ज्येष्ठ निरुपणकार आप्पासाहेब धर्माधिकारी यांच्या कृपेने मी हे काम करीत आहे. अजूनही काही ठिकाणी मुलीला जन्म देणे कमी समजतात. मुली प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत त्या विषयी जनजागृती मी करीत आहे, असे सामाजिक कार्यकर्ते दिलीप जाधव यांनी सांगितले.

## बीसीटी विधी महाविद्यालयाचा एनसीसी रहिवासी कॅम्प उत्साहात

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील भागूबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी विद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय रहिवाशी शिबिर तारा येथील ग्रामविकास प्रकल्प युसूफ मेहरली सेंटर याठिकाणी झाले. या शिबिरात बीएलएस आणि एलएलबीच्या विद्यार्थ्यांनी उत्साहपूर्वक सहभाग दर्शविला.

शिबिराचा प्रारंभ जागतिक महिला दिनी झाला. शिबिरात पोस्टर मेकिंग, सामाजिक मुद्द्यावरील पथनाट्य, ट्रेकिंग, श्रमदान, योगा व व्यायाम, ध्यान करणे, सांस्कृतिक उपक्रम, व्यक्तीमत्व विकास, स्वरक्षण, पर्यावरण जपवणूक व संरक्षण, प्रसार माध्यमांचा देश उभारणीतील प्रभाव, कायदेशीर सुधारणा आणि तरुणांच्या योगदानाद्वारे राष्ट्रीय विकास यावर तज्ज्ञ वक्त्यांकडून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांसोबतच विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या सानवी देशमुख, प्रा. डॉ. ममता गोस्वामी, प्रा.अपराजिता गुप्ता, एनएसएस शिबिर कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. क्रांती भोईटे, उज्ज्वल पाटील, ऋषिकेश हुडार, संजय देशमुख, प्रमोद कोळी, नितीन कोळी आदींनी उपस्थिती दर्शवली, अशी माहिती कॅम्पचे मुख्य कार्यक्रम अधिकारी प्रा. राघव शर्मा यांनी दिली. शिबिराचा समारोप कार्यक्रम संस्थेचे व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, ॲड. विनायक कोळी, प्राचार्या सानवी देशमुख, देविदास पाटील आदींच्या उपस्थितीत झाला.



## मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी विशेष वसुली पथके, धडक मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्यावतीने थकबाकीदारांच्या मालमत्ता कर वसुलीची मोहीम अधिक तीव्र केली असून, थकीत कराच्या वसुलीसाठी महापालिकेची धडक मोहीम सुरू केली आहे. आता दैनंदिन नऊ वसुली पथकांच्या बरोबरीने निवासी थकबाकीदारांकडून वसुली करणेकरीता सात वसुली पथकांची वाढ करण्यात आली आहे. परिणामी शनिवारी (दि. १६) सलग पाचव्या दिवशी एक कोटीहून अधिक रकमेचा भरणा पालिकेच्या तिजोरीत झाला आहे.

वसुली माध्यमातून महापालिकेच्या विविध भागांमध्ये जप्ती नोटिसांचे वाटप, तसेच थकबाकीदारांना मालमत्ता कर लवकर भरण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. निवासी,औद्योगिक व व्यवसायिक थकबाकीदारांनी थकीत मालमत्ता कर भरून जप्ती कारवाई टाळावी, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.

चारही प्रभागांमध्ये वसुली पथकांच्या माध्यमातून पनवेल महापालिका कार्यक्षेत्रातील थकीत मालमत्ता कर दात्यांना ४१० हून अधिक जप्ती नोटिसांचे वाटप करण्यात आले आहे. वसूली पथकांच्या माध्यमातून वसूली मोहीम तीव्र करण्यात आली असून आज खारघरमध्ये जेमटेक प्रायव्हेट लिमिटेड व ऑलिंपियो रिएलिटी या निवासी मालमत्तांवर अटकावणीची कारवाई करण्यात आली.

कर भरण्यासाठी महापालिकेत न येता ऑनलाईन पध्दतीने भरता यावा यासाठी महापालिकेने 'सिटीझन प्रॉपर्टी टॅक्स पेमेंट गाईड' तयार केले आहे. शंका असल्यास १८००-५३२०-३४० या क्रमांकावरती संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**उरण : राज्याच्या महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त चिरनेर येथील आश्रमशाळेत मुलांना शैक्षणिक साहित्य व खाऊचे वाटप करण्यात आले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुका अध्यक्ष परिक्षित ठाकूर, तालुका युवक अध्यक्ष समज भोंगले, माजी जि.प. सदस्य वैजनाथ ठाकूर, महिला अध्यक्ष कुंदा ठाकूर, तालुका सरचिटणीस दिनेश पाटील, संतोष ठाकूर, रत्नाकर म्हात्रे, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक अप्पासाहेब मोरे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.**



**पनवेल : पेठाली येथील दिलीप केणी यांची कन्या साक्षी हिचा विवाह कामोठे येथील सुरेश म्हात्रे यांचा पुत्र करण याच्याशी शनिवारी झाला. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पेठाली येथे जाऊन वधू साक्षीला शुभेच्छा दिल्या. सोबत माजी नगरसेवक हरेश केणी, भाजप नेते प्रल्हाद केणी.**



**पनवेल : न्हावाखाडी उत्तरपाडा येथील सुभाष ठाकूर यांचा पुत्र ऋषिकेश याचा विवाह उरण दिघोडे येथील कल्पेश गावंड यांची कन्या प्रसिद्धी हिच्यासोबत शनिवारी झाला. महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी न्हावाखाडी येथे जाऊन ऋषिकेशला शुभेच्छा दिल्या.**

## पाचवीच्या विद्यार्थिनीकडून शाळेच्या इमारत दुरुस्तीकरिता आर्थिक मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इयत्ता पाचवीत शिकणाऱ्या वैदेही मोरे या विद्यार्थिनीने शिवव्याख्यानाच्या माध्यमातून जमा झालेली रक्कम ५,५५५ रुपये नवीन पनवेलमधील २५ वर्ष जुनी शाळा आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हायस्कूलच्या इमारत दुरुस्तीकरिता दिली आहे. तिच्या या कार्याचे कौतुक होत आहे.

फडके हायस्कूलच्या इमारतीच्या दुरुस्तीकरिता सहाय्यता निधी जमा करण्यात येत असून या कार्यात समाजातील सर्व स्तरावरून हातभार लागत असताना ह्याच शाळेत शिकणारी १२ वर्षीय विद्यार्थिनी वैदेही मोरे ही इयत्ता ३ पासून आई - वडील व शाळेतील शिक्षकांच्या प्रोत्साहनांमुळे उत्तम व्याख्यान देते. आजवर तिचे महाराष्ट्रमध्ये ५५पेक्षा जास्त ठिकाणी शिवव्याख्याने व इतर विविध विषयांवर व्याख्याने झाली आहेत. व्याख्यानबद्दल तिला मानधनदेखील मिळते. रेडिओवरदेखील तिची मुलाखत झाली आहे. आजवर तिच्या शिवव्याख्यानाच्या



माध्यमातून जमा झालेल्या रक्कमेपैकी ५,५५५ रुपये इतकी रक्कम शाळेच्या दुरुस्तीकरीता स्वइच्छेने मुख्याध्यापिका शीतल साळुंखे यांच्याकडे चेकद्वारे सुपूर्त केली.

शाळेत प्रवेशकरिता कोणत्याही प्रकारचे डोनेशन घेण्यात येत नाही. अशा शाळा दीर्घकाळ ठिकाव्यात व त्यांच्या इमारतीदेखील सुस्थितीत राहाव्यात ह्यासाठीच सर्व सामान्य नागरिक सढळ हस्ते आर्थिक मद्दत करत आहेत. अशात एक खारीचा वाटा म्हणून ह्या विद्यार्थीने सामाजिक भान ठेवून व आपल्या आई वडिलांच्या मार्गदर्शनाखाली ही रक्कम शाळेला मद्दत देऊन आपल्या सर्वांसमोर एक आदर्श उभा केला आहे.

## खारघरमध्ये कोल्ह्याचा मृत्यू

**खारघर : प्रतिनिधी**

खारघर शहरात सेक्टर १५ वास्तुविहार सोसायटीच्या मागील बाजुस असलेल्या कांदळवणात (गोल्डन जॅकल) या प्रजातीच्या कोल्ह्याचा मृतदेह सापडल्याने एकच खळबळ उडाली आहे. मंगळवारी प्राणीमित्र सीमा टँक यांच्या ही बाब निदर्शनास येताच त्यांनी वनविभागाला याबाबत माहिती दिल्यावर वनविभागाने हा मृतदेह कोल्ह्याचा असल्याचा शिक्कामोर्तब केले. याबाबत शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा आहे. ते अहवाल समोर आल्यावर मृत्यूचे कारण स्पष्ट होणार आहे.

वनविभागाचे अधिकारी डी.एस. सोनावणे यांच्या मार्गदर्शनात या वेळी वनरक्षक महेश चन्नागिरे, जगदीश राक्षे, वनपाल अशोक घुगे आदी वनविभाच्या कर्मचाऱ्यांनी या मृतदेहाची पाहणी केली. या कोल्ह्याच्या मृतदेहाचा केवळ सांगाडा शिल्लक असल्याचे दिसुन येत आहे. पनवेल पंचायत समितीचे पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांनी याबाबत नमुने तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवले आहे.

मृत कोल्हा चार ते पाच वर्षांचा असावा, असा अंदाज वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला असून याबाबत आढावा घेतला जात आहे.

## पनवेलच्या आदिवासीवाड्यांमध्ये महिला दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


अधिवक्ता परिषद, पनवेल तालुकातर्फे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून शुक्रवारी (दि. १५) पनवेल तालुक्यातील दुर्गम अशा तामसई (वाडी) व बोंडरपाडा या गावांमध्ये महिला दिनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम अधिवक्ता परिषद, पनवेलचे अध्यक्ष अधिवक्ता राजेंद्र महादेव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली आणि मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला होता.



या कार्यक्रमास अधिवक्ता ॲड. मनोज भुजबळ उपाध्यक्ष (संघटन), अधिवक्ता परिषद, रायगड जिल्हा तथा अध्यक्ष, पनवेल बार असोसिएशन, अधिवक्ता सुनील नारायण तेलगे, सचिव/मंत्री (संघटन), अधिवक्ता परिषद, रायगड जिल्हा, अधिवक्ता मनोज म्हात्रे, कार्यालयीन सचिव, रायगड जिल्हा, प्रल्हाद खोपकर, कार्याध्यक्ष, अधिवक्ता परिषद, पनवेल तालुका, अस्मिता भुवड, सचिव (संघटन), अधिवक्ता परिषद, पनवेल तालुका, अधिवक्ता आशा भगत, उपाध्यक्ष (लिटिगेशन), अधिवक्ता परिषद, पनवेल तालुका, अधिवक्ता पोर्णिमा सुतार, अधिवक्ता नूतन केणी, अधिवक्ता सुवर्णा तांडेल, अधिवक्ता छाया म्हात्रे, अधिवक्ता सुनीता प्रभू, अधिवक्ता दर्पण पाटील, अधिवक्ता अंजली जाधव, अधिवक्ता मनीषा गावंडे, अधिवक्ता मनीषा गायकर, अधिवक्ता सुजाता शेलार, अधिवक्ता सारिका लबडे, आधिवक्ता ज्योती उरणकर, अधिवक्ता शशिकांत कालू म्हात्रे, अधिवक्ता धनराज तोकडे, अधिवक्ता शशिकांत आलू म्हात्रे, अधिवक्ता भूषण म्हात्रे तसेच अधिवक्ता परिषदेचे इतर पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून सामजिक कार्यकर्ते चेतन वाघ उपस्थित होते. त्यांनी आदिवासींकरीता असलेल्या विविध कल्याणकारी सरकारी योजनांविषयी माहिती दिली.

या कार्यक्रमात अधिवक्ता अमिता वीरकर, अधिवक्ता ज्योती उरणकर, अधिवक्ता मनोज भुजबळ, अधिवक्ता सुनील तेलगे, अधिवक्ता आशा भगत यांनीदेखील उपस्थित महिला वर्गाला जागतिक महिला दिनानिमित्त मार्गदर्शन केले. तसेच त्यानंतर मौजे तामसई वाडी तसेच मौजे बोंडरपाडा येथील आदिवासी महिलांना साड्यांचे वाटप करण्यात आले.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने अधिवक्ता परिषद, पनवेल यांनी अभिनव उपक्रम घेऊन आयोजित केलेल्या हा कार्यक्रम उत्साहात झाला. कार्यक्रमाचे समाजातील विविध वर्गाकडून स्वागत व कौतुक करण्यात आले.











# निवडणुकीची हवा वाढतेय

## राजकीय 'पिक्चर' पाहूद्या की...

झूम प्रहर



दिलीप ठाकूर
चित्रपट समीक्षक

प्रत्येक दिवसासोबत लोकसभा निवडणूक अधिकाधिक जवळ येत चाललीय, नवा रंग, रूप घेऊ लागलीय आणि एकूणच सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, माध्यम क्षेत्रातील माहौल अर्थात वातावरण बदलत चाललंय हे तुम्हीही अनुभवत आहात.

हाच मूड आहे अनेक प्रकारचे जुने व नवीन राजकीय चित्रपट पाहण्याचा, अनुभवण्याचा आणि शक्य तितके राजकारण समजून घेण्याचा. जुने अनेक राजकीयपट पुन्हा पुन्हा पहावेत असेही आहेत. यातील अनेक चित्रपट मल्टीप्लेक्समध्ये 'राजकीय चित्रपटांचा महोत्सव' म्हणून प्रदर्शित करता येतील. त्यानिमित्त या चित्रपटांचे दिग्दर्शक व अनेक कलाकारांना आमंत्रित करता येईल. काही चित्रपट मनोरंजक उपग्रह वाहिनीवर प्रक्षेपित करता येतील. त्या चित्रपटांची काही वैशिष्ट्य यानिमित्ताने रसिकांसमोर आणता येतील. ओटीटीवर काही राजकीयपटांना नक्कीच स्थान आणि मग चांगल्या प्रमाणावर प्रेक्षक मिळू शकतात. डिजिटल मीडियात राजकारण व राजकीय चित्रपट यावर मुलाखतीही घेता येतील. असे चित्रपट पाहण्यासाठीचे वातावरण सध्या वाढतेय. चित्रपट पाहण्याचा एक मूड असतो.

डॉ. जब्बार पटेल दिग्दर्शित सामना आणि सिंहासन हे मराठीतील उत्तमोत्तम कलाकारांच्या अभिनयाची मेजवानी हे चित्रपट कधीच कालबाह्य होणारे नाहीत. सत्तरच्या दशकातील हे कृष्ण धवल अर्थात ब्लॅक ॲण्ड व्हाईट स्वरूपातील चित्रपट असून त्यांचा 'गुणवत्तेचा रंग' काही वेगळाच. तो कधीच बोथट न होणारा.

असाच एक राजकीय पार्श्वभूमीवरील क्लासिक चित्रपट जे. ओम. प्रकाश निर्मित व गुलजार दिग्दर्शित 'आंधी' (मुंबईत रिलीज १४ फेब्रुवारी १९७५). ही खरंतर राजकीय नेता आरतीदेवी (सुचित्रा सेन) आणि त्यांचा पती (संजीवकुमार) यांच्या प्रेमाची गोष्ट. राजकारणात मुरलेल्या एका विवाहितेचे पतीशी असलेले नाते आणि राजकारणामुळे त्यांना एकमेकांचा सहवास कसा मिळवावा लागतो याची हळूवार गुलजार टच प्रेमकथा म्हणजे हा चित्रपट. हा चित्रपट समिक्षक, विश्लेषक, सिनेरसिकांची उत्तम दाद मिळवत असतानाच २५ जून १९७५ रोजी देशात आणीबाणी लागू झाली आणि याच्या प्रदर्शनावर बंदी आली. यातील सुचित्रा सेनने साकारलेली व्यक्तिरेखा तत्कालिन पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्यावर बेतली आहे हा यावरचा मोठाच आक्षेप होता. या चित्रपटातील गीत-संगीत (गुलजार आणि राहुल देव बर्मन) आजही लोकप्रिय आहे. इस मोड पे जाते है..., तुम आ गये हो..., तेरे बिना जिंदगी से कोई... एव्हरग्रीन गाणी. आजही ही गाणी ऐकली तरी मन प्रसन्न होते. आणीबाणीत सामना चित्रपटाचेही प्रदर्शन स्थगित करण्यात आले. पुणे शहरात हा चित्रपट १० जानेवारी रोजी प्रभात चित्रपटगृहात दाखल झाला, पण आणीबाणीत विघ्न आले. १९७७च्या सुरुवातीला म्हणजेच एकोणीस महिन्यांनंतर आणीबाणी उठल्यावर हे चित्रपट पुन्हा सेन्सॉरने पाहिल्यावर काही कटस सुचवले आणि मग ते पुन्हा प्रदर्शित झाले. आजही म्हणजेच चित्रपट रसिकांच्या तीन पिढ्या ओलांडूनही या चित्रपटांचा दबदबा कायम आहे. आणीबाणीतच रामराज नहाटा निर्मित किस्सा कुर्सी का या चित्रपटावर सेन्सॉरने बरेच कटस सुचवल्याची भरपूर चर्चा रंगली.

'सामना' त्या काळातील ग्रामीण महाराष्ट्रातील वास्तवाचे दर्शन होते. विशेषतः सहकारी साखर कारखानदार सधन शेतकरी घेऊ लागले होते. हेच साखर कारखानदार साखरसम्राट बनू लागले होते. विजय तेंडुलकर यांच्या कथा-पटकथेवर निर्माते रामदास फुटाणे व दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी 'सामना'ची निर्मिती केली. गावातील सहकारसम्राट धोंडे पाटील (निळू फुले) व गांधीवादी मास्तर (डॉ. श्रीराम लागू) यांच्यातील मैत्री व वैराची ही कथा त्या काळात विलक्षण वादळी ठरली. 'सिंहासन'देखील त्या काळातील महाराष्ट्रातील राजकारणाचा पट आपल्यासमोर मांडतो. या चित्रपटाची घोषणेपासूनच बरीच उलटसुलट चर्चा रंगू लागली. हा चित्रपट अरुण साधू यांच्या 'मुंबई दिनांक' आणि 'सिंहासन' या दोन कादंबऱ्यावर आधारित हे विशेष. यावर विजय तेंडुलकर यांची पटकथा आणि प्रभावी संवाद. मंत्रिमंडळातील सत्तासंघर्ष व स्पर्धा. मुंबईतील अनभिषिक्त संपसम्राट कामगार संघटनेचा नेता डिकॉस्टा आणि मुख्यमंत्री यांच्यातील सामना राजकीय पत्रकार दीगू टिपणीस हे सगळे डावपेच, कुरघोड्या पाहून अचंबित होतो. अखेरीस तो हतबल होतो. त्यानंतर प्रत्यक्षातील काही राजकीय घटनांच्या वेळेस सोशल मीडियावर 'सिंहासन'मधील अनेक बोलकी दृश्य व्हायरल झाली. हा या चित्रपटाचा प्रभाव म्हणता येईल. अशा काही कलाकृती पडद्यावरून उतरल्या तरी अनेक संदर्भात त्यांचे अस्तित्व कायम असते. हीच या माध्यमाची ताकद आहे. अरुण सरनाईक यांनी साकारलेला मुत्सद्दी मुख्यमंत्री आणि निळू फुले यांनी साकारलेला चिकित्सक राजकीय पत्रकार यांची कायमच चर्चा होत असते.


नेक प्रकारचे राजकीयपट प्रत्येक काळात पडद्यावर आले. काही चांगले होते. काही वरवरचे होते. जे प्रभावी होते त्यांची कायमच दखल.

१९८४ साली कमालच झाली. दासरी नारायण राव दिग्दर्शित आज का एमएलए रामअवतार (या चित्रपटात राजेश खन्नाने साकारलेली मुख्यमंत्र्यांची भूमिका त्याच्या सर्वोत्कृष्ट भूमिकांपैकी एक...), टी. रामाराव दिग्दर्शित इन्कलाब (चित्रपटाच्या क्लायमॅक्सला अमिताभ बच्चन अतिशय संतापून मशिनगनने अख्खं मंत्रिमंडळ उडवतो याची बरीच उलटसुलट चर्चा रंगली), टी. रामाराव दिग्दर्शित यह देश (यातील कमल हसनची अदाकारी छान होती. ती कधी नसते?) हे चित्रपट त्या वर्षी अंतरा अंतराने प्रदर्शित झाले. तीनही चित्रपट दक्षिणेकडील प्रादेशिक भाषेतील चित्रपटांचे रिमेक, पण हिंदी चित्रपटाच्या रसिकांना रूचले नाहीत. त्यामुळेच तिनही पिक्चर फ्लॉप. हे चित्रपट गल्ला पेटीवर यशस्वी ठरले असते, तर हिंदीत केव्हाच राजकीयपट रूजला असता. अनेक हिंदी चित्रपटात विविध प्रकारचे राजकीय नेते, मात्र एक व्यक्तीरेखा म्हणून कायमच दिसत आले. मग तो महेश भट्ट दिग्दर्शित 'सारांश' असो असो अथवा राहुल रवैल दिग्दर्शित 'अर्जुन' असो.

हिंदीत अधूनमधून राजकीयपट अथवा राजकारणाची पार्श्वभूमी असलेले चित्रपट पडद्यावर येत असतातच. टीनू आनंद दिग्दर्शित 'मै आझाद हू'पासून रामगोपाल वर्मा दिग्दर्शित 'सरकार'पर्यंत आणि एन. चंद्रा दिग्दर्शित 'नरसिंह'पासून ते रामगोपाल वर्मा दिग्दर्शित 'सरकारराज'पर्यंत बरीच नावे सांगता येतील. यात आपण 'नेहरू', 'ठाकरे', 'मै अटल हू' अशा चरित्रपटांचा समावेश करणे योग्य नाही. मराठीतही अनंत माने दिग्दर्शित 'गल्ली ते दिल्ली'पासून ते समीर विध्वंस दिग्दर्शित 'धुरळा'पर्यंत आणि संजय सूरकर दिग्दर्शित 'घराबाहेर'पासून गजेंद्र अहिरे दिग्दर्शित 'शासन'पर्यंत आणि उज्वल ठेंगडी दिग्दर्शित 'वजीर' श्रावणी देवधर दिग्दर्शित 'सरकारनामा'पासून जयप्रद देसाई दिग्दर्शित 'नागरिक'पर्यंत अनेक चित्रपट पडद्यावर आले. काहींना उत्तम व्यावसायिक यशही प्राप्त झाले. काहींची फक्त चर्चाच होत राहिली.

सध्याच्या आजूबाजूच्या राजकीय गरमागरमीत हे राजकीयपट पाहणे म्हणजेच वेगळी मेजवानीच. चित्रपट शौकीन व राजकारणात रस घेणारा वर्ग अशा दोघांनाही हे चित्रपट पुन्हा पहायची उत्तम संधी. या राजकीयपटातील काही गोष्टी सध्याच्या वातावरणात वेगळ्या वाटतील. काही गोष्टीचे संदर्भ लक्षात येतील. शहरी भागातील राजकारण आणि ग्रामीण भागातील राजकारण यातील फरक लक्षात येईल. पूर्वीचे तत्वधिष्ठित राजकारण आणि आजचे आयाराम गयारामचे राजकारण समजून येईल. जे जे राजकारणात आहे, त्याचे बरे वाईट प्रतिबिंब चित्रपटातून पडत असतेच. त्यात बरेचसे तथ्य असतेच. महाराष्ट्रातील राजकारण वेगळे आणि उत्तर प्रदेश, बिहारमधील वेगळे. दक्षिणेकडील तर भव्य कटआऊटसचे त्याहीपेक्षा वेगळे. हे सगळेच आपल्याला वेगवेगळ्या चित्रपटांतून दिसत आले आहे. सध्याच्या राजकीय पार्श्वभूमीवरील हे बरेचसे चित्रपट पुन्हा एकदा पाहण्याची मेजवानी कोणाला नको हो? हवीच आहे.









# आधुनिक मराठी गद्याचे जनक विष्णूशास्त्री चिपळूणकर

आधुनिक मराठी गद्याचे जनक म्हणून ओळखले जाणारे श्रेष्ठ मराठी ग्रंथकार विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचा आज स्मृतिदिन. त्यांच्या अगोदर आधुनिक मराठी गद्य जवळजवळ अर्ध्या शतकाहून अधिक काळ निर्माण होत होते, परंतु विष्णूशास्त्रींनी त्याला अधिक प्रभावी स्वरूप प्राप्त करून दिले.

विष्णूशास्त्रींचा जन्म पुण्यात २० मे १८५० रोजी झाला. मुंबई विद्यापीठाची बीएची परीक्षा पुण्याच्या डेक्कन कॉलेजमधून ते उत्तीर्ण झाले. त्यानंतर पुणे व रत्नागिरी येथील सरकारी माध्यमिक शाळांतून त्यांनी शिक्षकाची नोकरी केली. विष्णूशास्त्रींचे वडील कृष्णशास्त्री हे संस्कृतज्ञ. इंग्रजी साहित्याचे जाणकार, रसिक, विद्वान आणि चतुरस्त्र मराठी लेखक असल्याने विष्णूशास्त्रींनाही लेखनवाचनाची गोडी लागली. कृष्णशास्त्रींनी चालविलेल्या शालापत्रक या मासिकातून विष्णूशास्त्रींच्या लेखनाचा आरंभ झाला व त्यानंतर काही वर्षांतच ते या मासिकाचे संपादकही झाले. तथापि, त्यांच्या संपादकीय कारकीर्दीत शालापत्रकातून सरकार व ख्रिस्ती मिशनरी यांच्यावर त्यांनी केलेल्या खोचक टीकेचा गवगवा होऊन शालापत्रक बंद पडले. सरकारी नोकरीत असतानाच त्यांनी निबंधमाला हे सुप्रसिद्ध मासिक काढले तसेच ज. बा. मोडक आणि का. ना. साने यांच्या सहकार्याने काव्येतिहाससंग्रह हे मासिक सुरु केले. आपल्या देशातील लोकांनी रचिलेली काव्ये, लिहिलेले इतिहास, बखरी असे साहित्य प्रसिद्ध करून त्यामार्गे देशसेवा करणे हा हे मासिक काढण्यामागील हेतू होता. तथापि, या मासिकावर विष्णूशास्त्रींनी संपादक म्हणून आपले नाव घातले नव्हते. १८८०मध्ये नव्या पिढीच्या मनावर देशाभिमानाचे संस्कार करण्यासाठी टिळक-आगरकरांच्या सहकार्याने त्यांनी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल ही ख्यातनाम शाळा स्थापन केली. त्याच वर्षी कडव्या राष्ट्रवादाचा पुरस्कार करणारी दोन वृत्तपत्रे केसरी हे मराठी आणि मराठा हे इंग्रजी त्यांनी काढली. याशिवाय चित्रशाळा, आर्यभूषण छापखाना, किताबखाना यांसारखे समाजशिक्षणोपयोगी उपक्रम त्यांनी सुरू केले.



निबंधमाला हे विष्णूशास्त्रींचे प्रमुख जीवितकार्य. निबंधमालेच्या सात वर्षांच्या कारकीर्दीत निघालेल्या सर्वच्या सर्व म्हणजे ८४ अंकांतील लेखन विष्णूशास्त्रींनी जवळजवळ एकटाकी केले. निबंधमालेत विविध विषयांवर लिहिलेल्या त्यांच्या निबंधांनी मराठी निबंधाला सामर्थ्य दिले आणि त्याच्या विकासाचा एक महत्त्वाचा टप्पा गाठला. कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी सुरू केलेले सॅम्युएल जॉन्सनच्या रासेलस या ग्रंथाचे भाषांतर विष्णूशास्त्रींनीच शालापत्रकातून क्रमशः पूर्ण केले. याच मासिकातून कालिदास, भवभूती, बाण, सुबंधू आणि दंडी या संस्कृत कवींवर त्यांनी जे समीक्षात्मक निबंध लिहिले, ते पुढे संस्कृत कविपंचक या नावाने प्रसिद्ध झाले. या निबंधानी काव्यसमीक्षेच्या पाश्चात्त्य दृष्टीला महत्त्व दिले व प्राचीन कवींचा काल, कविता आणि कला यांच्या मीमांसेत ऐतिहासिक दृष्टी वापरली.

शालापत्रक, निबंधमाला, केसरी इ. नियतकालिकांतून विष्णूशास्त्रींनी जे लेखन केले ते भाषा-साहित्यविषयक, सामाजिक, राजकीय असे विविध प्रकारचे आहे. त्यांच्या भाषा-साहित्यविषयक लेखांत मराठी भाषेची तत्कालीन स्थिती, भाषापद्धती, परभाषेतील शब्दांची योजना, इंग्रजी भाषा, कविता, विद्वत्व आणि कवित्व, ग्रंथांवरील टीका वगैरे विषयांवरील लेखन अंतर्भूत आहे. लोकभ्रम, अनुकरण, गर्व यांसारखे विषय त्यांच्या सामाजिक लेखनात आलेले आहेत. 'आमच्या देशाची स्थिती' आणि 'मुद्रणस्वातंत्र्य हे दोन लेख त्यांच्या राजकीय लेखनापैकी विशेष उल्लेखनीय होत.

स्वदेश, स्वधर्म आणि स्वभाषेविषयीचा अभिमान ही त्यांच्या लेखनामागील प्रेरणा होती. या तिन्ही संदर्भांत सामान्यतः उदासीन असलेल्या आणि इंग्रजी राजवटीच्या आहारी जाऊन स्वतःचा देश, त्याने दिलेला सांस्कृतिक वारसा आणि परंपरा यांना कमी लेखणाऱ्या तत्कालीन सुशिक्षितांना चेतवणी देणे हा त्यांच्या लेखनामागील एक प्रमुख हेतू होता. तो साधण्यासाठी सालंकार, संस्कृत काव्यशैली आणि डिसन, मेकॉले या इंग्रजी निबंधकारांचे डौलदार निबंधलेखन यांच्या संस्कारांतून घडलेली समर्थ आणि प्रभावी गद्यशैली त्यांनी वापरली.

स्वमताविषयी तारुण्यसुलभ अभिनिवेश आणि परमतखंडनातील धारदार उपहास-उपरोध, सुभाषितांचा मार्मिक उपयोग, पल्लेदार वाक्यरचना ही त्यांच्या शैलीची काही लक्षणीय वैशिष्ट्ये. या लेखनाने मराठी गद्याला प्रौढता आणली अनेकांना राष्ट्रभक्तीची, इतिहाससंशोधनाची आणि साहित्यसेवेची प्रेरणा दिली. राजकीय वा सामाजिक चळवळीत विष्णुशास्त्री प्रत्यक्ष पडले नाहीत आपला परंपराभिमानी राष्ट्रवाद जोपासण्याच्या भरात प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधक समाज, आंग्लशिक्षित सुधारक मंडळी, ख्रिस्ती धर्मोपदेशक यांना सरसकट परधार्जिणे ठरवून त्यांनी जी अनुदार टीका केली, तीत व्यापक सामाजिक जाणिवेचा अभाव होता. हे आता कालौघाबरोबर स्पष्ट झाले आहे. पुणे येथे १७ मार्च १८८२ रोजी विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचे निधन झाले. (साभार : मराठी विश्वकोष)

# आदर्श आचारसंहिता म्हणजे काय?

लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर होण्याची प्रतीक्षा अखेर संपली. निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. त्याचबरोबर आदर्श आचारसंहिताही लागू झाली आहे. निवडणुकीची आचारसंहिता काय असते हे फार कमी लोकांना माहिती असते. आचारसंहिता म्हणजे काय आणि ती कधी लागू होते? आचारसंहिता लागू झाल्यानंतर कुठल्या गोष्टींवर बंदी असते? या आणि अशा अनेक प्रश्नांची उत्तर आज आपण जाणून घेणार आहोत...

भारतीय घटनेच्या कलम ३२४ अन्वये संसद आणि राज्य विधिमंडळाच्या निवडणुका मुक्त, पारदर्शक आणि शांततापूर्ण वातावरणात होण्यासाठी राजकीय पक्ष आणि उमेदवार वैधानिक कर्तव्ये योग्य रितीने बजावतात का यावर निवडणूक आयोग देखरेख करतो, तर राजकीय पक्षांनी आणि त्यांच्या उमेदवारांनी निवडणुकीच्या काळात काय करावे आणि काय करू नये याची नियमावली म्हणजेच आचारसंहिता.

निवडणूक आयोगाकडून लोकसभा आणि राज्यसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर करताच आदर्श आचारसंहिता लागू होते. ही आचारसंहिता निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत लागू राहते. लोकसभा निवडणूक असल्यास संपूर्ण देशात आचारसंहिता लागू होत असते आणि विधानसभेसाठी निवडणूक असेल तर राज्यस्तरावर आचारसंहिता लागते. याशिवाय पोटनिवडणुकीची संहिता संबंधित मतदारसंघाच्या परिसरातच लागू होत असते.

आदर्श आचारसंहितेमध्ये राजकीय पक्ष, उमेदवारांनी निवडणूक प्रचार, सभा आणि मिरवणुका, मतदान दिवसाचे कामकाज आणि कामकाजादरम्यान कसे वागावे याबद्दल नियम सांगण्यात आलेले असते. निवडणूक प्रचारादरम्यान, कोणताही पक्ष किंवा उमेदवार परस्पर द्वेष निर्माण होईल किंवा विविध जाती आणि समुदायांमध्ये धार्मिक किंवा भाषिक तेढ निर्माण होईल असे कुठल्याही प्रकारचे कृत्य करू शकत नाही. अगदी असत्यापित आरोप किंवा विकृतीवर आधारित टीका या काळात करीत येत नाही.



आचारसंहितेचे पालन केले नाही तर कायदे आणि नियमांचे उल्लंघन मानले जाते. जी व्यक्ती किंवा पक्ष या नियमांचे उल्लघंन करते त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई केली जाते. त्या व्यक्तीला बडतर्फही केले जाते.

आदर्श आचारसंहिता लागू झाल्यानंतर कोणत्याही पक्षाच्या किंवा उमेदवाराला सरकारी विमान, वाहन इत्यादींसह कोणत्याही वाहनांचा वापर करता येत नाही.

आचारसंहिता लागू झाल्यानंतर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या बदल्या आणि बढती करण्यावर बंदी असते. जर एखाद्या अधिकाऱ्याची बदली किंवा बढती अतिशय आवश्यक असेल तर त्यासाठी निवडणूक आयोगाची परवानगीची गरज असते. निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्यानंतर विशिष्ट क्षेत्रात अशा योजनेचे उद्घाटन, घोषणा करता येत नाही. नियमाचे उल्लघंन केल्यास कारवाई होते.

राजकीय पक्षांना एकमेकांच्या राजकीय धोरणावर टीका करण्याची मुभा असते. ते त्यांच्या कामकाजावर टीका करू शकतात, पण मते मिळवण्यासाठी ते एकमेकांची जात किंवा धर्म काढू शकत नाहीत. मंदिर, मशिदी, चर्च, गुरूद्वारा किंवा इतर कोणत्याही प्रार्थनास्थळांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके आणि निवडणूक प्रचाराची जागा म्हणून करू नये. इतर पक्षांनी लावलेली भित्तीपत्रके काढून टाकू नये अथवा विद्रुप करू नये.

आदर्श आचारसंहितेचा कालावधी हा निवडणुकीची तारीख जाहीर झाल्यापासून ते निवडणुकीचे निकाल लागेपर्यंत आचारसंहिता पाळण्याचे कायदेशीर बंधन असते. भारतीय दंडविधान आणि क्रिमिनल प्रोसेजर कोड तसेच लोकप्रतिनिधी कायदा १९५१मध्ये ज्या नियमांचा समावेश आहे त्यांचे उल्लंघन झाल्यास कायदेशीर कारवाई केली जाऊ शकते.

आचारसंहितेत निवडणुका घोषित होण्यापूर्वी निवडणूक क्षेत्रात प्रत्यक्षपणे सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे चालू ठेवता येतील. पूर, अवर्षण, रोगाची साथ किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांतील जनतेसाठी पुनर्वसन कार्य सुरू ठेवता येईल. गंभीररित्या आजारी असेलेल्या व्यक्तींना वैद्यकीय सुविधा चालू ठेवता येईल.

भारतातील निवडणुकांच्या प्रवासाचे दस्तऐवजीकरण करण्यासाठी निवडणूक आयोगाने एक पुस्तक प्रकाशित केले आहे. पुस्तकात असे लिहिले आहे की, भारतीय निवडणूक आयोगाने १९६८-६९च्या मध्यावधी निवडणुकांमध्ये २६ सप्टेंबर १९६८ रोजी 'किमान आचारसंहिता' या शीर्षकाखाली आदर्श आचारसंहिता प्रथम जारी केली होती. या संहितेत १९७९, १९८२, १९९१ आणि २०१३मध्ये आणखी सुधारणा करण्यात आली.

निवडणुकीदरम्यान राजकीय पक्षांची भूमिका आणि जबाबदाऱ्या या पुस्तकात देण्यात आल्या असून निवडणूक प्रचार आणि प्रचारादरम्यान किमान आचारसंहितेचे पालन करण्याचे राजकीय पक्षांना आवाहन करण्यात आले आहे. (साभार : इंटरनेट)

# मुरुडचे शेकाप कार्यकर्ते नाराज

## राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये करणार प्रवेश



**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील सर्वांत जुने व प्रमुख कार्यकर्ते यांनी शेतकरी कामगार पक्षाचे रायगड जिल्हा सहचिटणीस मनोज भगत यांच्या नेतृत्वाखाली एकत्र येऊन मुरूड तालुका चिटणीस अजीत कासार यांच्यासह असंख्य कार्यकर्ते यांनी शुक्रवारी (दि. १५) पत्रकार परिषदेमध्ये जाहीर करण्यात आले की, लवकरच सर्व कार्यकर्त्यांसोबत अजितदादा पवार गट राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये लवकरच जाहीर प्रवेश करणार असल्याची घोषणा करण्यात आली आहे.

या वेळी पत्रकार परिषदेमध्ये रायगड जिल्हा सहचिटणीस मनोज भगत, मुरूड तालुका चिटणीस अजीत कासार, माजी सरपंच मनीष नांदगावकर, संतोष कांबळी, मनोहर पानवलकर, सचिन पाटील, विकास दिवेकर, आगरदांडा उपसरपंच संतोष पाटील, मनोहर मेहत्तर, माजी सभापती बाबू नागावकर, माजी सभापती किशोर धामणसकर, जयंत कासार, भाई मयेकर, ऋत्विज मकु आदी उपस्थित होते.

या वेळी मनोज भगत यांनी सांगितले की, शेकाप मधील तरुण नेतृत्व उदयास आले व एकनिष्ठ असणाऱ्या कार्यकर्त्यांना डावलण्याचा कार्यक्रम एकमार्गी सुरू करण्यात आला. पक्षातील ठराविक लोकांना एकत्र घेऊन आम्हाला मात्र रीतसर बाजूला काढण्यात आले. त्यामुळे सर्व कार्यकर्त्यांमध्ये असंतोष वाढला व अखेर आम्ही पक्ष बदलण्याचा निर्णय घेतला आहे.

१९९३पासून आम्ही शेकापचे निष्ठेने काम करीत आहोत. या वेळी आमदार जयंत पाटील व माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांचे सुद्धा बहुमूल्य सहकार्य लाभले आहे. माजी आमदार पंडित पाटील तसेच पक्ष प्रतोद आस्वाद पाटील यांनीसुद्धा आम्हाला उत्तम सहकार्य केले आहे. कार्यकर्त्यांच्या सन्मानासाठी एकत्र येऊन हा पक्ष बदली करण्याचा निर्णय घेतला असल्याचे भगत यांनी सांगितले. ज्या ज्या वेळी पक्षाचे आदेश आले त्या त्या वेळी आम्ही पक्षाचे निष्ठेने काम केले. वरिष्ठ नेत्यांना चुकीचे कानात सांगण्यात आले त्यामुळे आम्हा कार्यकर्त्यांना एका बाजूला टाकण्यात आले. राष्ट्रवादी पक्षात प्रवेश करताना कोणतीही अट ठेवण्यात आलेली नाही. आम्ही सर्व स्वखुशीने पक्ष प्रवेश करणार असल्याचे या वेळी सांगण्यात आले.

शेकाप मुरूड तालुका चिटणीस अजीत कासार यांनी सांगितले की, पक्षातील अंतर्गत वाद यामुळे सर्व कार्यकर्ते एकवटले गेले. त्यामुळे आम्ही सर्वांनी मनोज भगत यांच्या पाठीशी खम्बिरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे. पक्षातील असंतोष आहे हे मी वरिष्ठांना कळवले होते, परंतु त्यांनी लक्ष न दिल्यामुळे आज हि परस्थिती उदभवली आहे. संतोष कांबळी यांनी सांगितले की, विकास कामे रखडली त्यामुळे नाराजी वाढत गेली. त्यामुळे पक्ष बदलीचा निर्णय घेतला असल्याचे सांगितले.

# मुरूड–साळाव रस्त्याचे डांबरीकरण सुरू

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड–साळाव आगरदांडा ४० किलोमीटर अंतराचा रस्ता अनेक वर्षांपासून खड्डेमय होता. स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्या विशेष प्रयत्नांनामुळे कित्येक वर्षे रखडलेल्या साळाव ते आगरदांडा रस्त्याला निधी प्राप्त करून दिला. निधी प्राप्त होताच या रस्त्याचे खासदार सुनील तटकरे व आमदार महेंद्र दळवी यांच्या हस्ते भूमिपूजन झाले. त्यानंतर आता साळाव चेक पोस्टपासुन रस्ता डांबरीकरणाला सुरुवात झाली आहे. लवकरच संपूर्ण रस्ता खड्डे मुक्त होऊन चकाचक होईल.

मुरूड–साळाव आगरदांडा या रस्त्यावरून अनेकांचे छोटे मोठे अपघात होत होते. पर्यटकांची संख्या ही रोडावली होती. यामुळे व्यवसायीकांना वाहनचालकांना आर्थिक फटका सहन करावा लागत होता, परंतु स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांनी बांधकाम मंत्री यांच्याशी संपर्क साधुन व प्रत्यक्ष भेटुन रस्ता संदर्भातील वस्तू स्थिती मांडुन हा रस्ता नव्याने बनला पाहिजे. त्याकरिता भरघोस निधी उपलब्ध करून द्यावी या मागणीकरिता सतत पाठपुरावा केल्याने सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांनी या रस्त्याला निधी प्राप्त करून दिली.

निधी प्राप्त होताच या रस्त्याचे भूमिपूजन नांदगाव या ठिकाणच्या रस्तावर आमदार महेंद्र दळवी व खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते या रस्ता कामाचे भूमिपूजन करण्यात आले. त्यावेळी आमदार महेंद्र दळवी यांनी नागरिकांना वचन दिले होते की दोन महिन्यांत हा संपूर्ण रस्ता नव्याने बनुन खड्डे मुक्त झालेला दिसेल. अखेर साळाव चेकपोस्टपासून रस्त्याच्या डांबरीकरणाला सुरुवात झाली आहे.


MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd. **e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-71/ 23-24 RFX 7000031012 | Scheme for replacement of existing old equipments at 220kV Mahad S/stn and 100kV Roha S/stn. under EHV (O&M) Division Mahad. | Rs.175.03 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids uto 23.03.2024 up to 11:00 hrs, Opening date:- 23.03.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8530095666 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd. **e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-67/ 23-24 RFX 7000030852 | Replacement of 1 No. of 220kV cable termination kit alongwith straight through joint of 220kV Kharghar - Sonkhar line in extended yard at 400kV R.S. Kharghar. | Rs. 29.25 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids from 15.03.2024 to 23.03.2024 up to 11:00 hrs, Opening date:-23.03.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8530095666 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**


## निवडक

### हिरवळ महाविद्यालयात महिला दिन




**माणगाव :** हिरवळ एज्युकेशन ट्रस्ट कॉलेज ऑफ सायन्स (सीएसआयटी) महाडमध्ये जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत एक संस्मरणीय सोहळ्याचे आयोजन महाविद्यालयातील आयक्युएसी विभाग व महिला विकास कक्ष यांनी केले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मोनिका गोंधळी (संचालक, मोनिक्स सलोन, महाड तथा मेकअप आर्टिस्ट आणि क्लिनिकल कॉस्मेटोलॉजिस्ट) उपस्थित होत्या. प्राचार्य श्री. सुदेश कदम यांनी प्रास्ताविक सादर केले. हिरवळ एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया व मुख्य सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी सर्व महिलांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आयक्युएसी समन्वयक प्रा. ज्योती पुजारी यांनी आभार मानले.

### हेमंत तोडणकर यांचा सत्कार

**मुरूड :** तालुक्यातील आगरदांडा गावचे रहिवाशी व प्रसिद्ध कबड्डीपट्टू हेमंत केशव तोडणकर यांची मुंबई उपनगर कबड्डी असोशिएनच्या श्री साई गजानन पॅनलतर्फे भरघोस मतांनी विजय झाल्याबद्दल आगरदांडा ग्रुप ग्रामपंचायत व बजमे ए इतिहाद मुस्लिम समाजतर्फे हेमंत तोडणकर यांचे विशेष सत्कार करण्यात येऊन त्यांना शाल श्रीफळ व सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. हेमंत तोडणकर हे मुंबई भंडारी समाजाचे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत असून सामाजिक कार्यात सुद्धा ते नेहमी सहभागी होत असतात. त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. सदरील सत्कार समारंभास माजी सरपंच नरेंद्र हेदुलकर, माजी उपसरपंच युसूफ अर्जबेगी, भाईलाल गांधी आदींसह मुस्लिम व हिंदू समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# असंघटित नाका कामगारांना भांडीवाटप



**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महाड, माणगाव, पोलादपूर, रोहा, तळा, म्हसळा, मुरूड येथील असंघटित नाका कामगारांना महाडच्या पंचायत समितीमध्ये इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळामार्फत गृहोपयोगी भांड्यांच्या संचाचे वाटप करण्यात आले.

हा उपक्रम कामगार उपआयुक्त बाळासाहेब वाघ, सहाय्यक कामगार आयुक्त शीतल कुलकर्णी, सहाय्यक कामगार आयुक्त समीर चव्हाण, सरकारी कामगार अधिकारी सचिन कोल्हाड व सहाय्यक संच वाटप अधिकारी मंदार परब यांच्या आदेशाने कार्य करण्यात आले.

पंचायत समिती महाड येथील सभागृहामध्ये पंचायत समिती महाडच्या गटविकास अधिकारी स्मिता पाटील, विस्तार अधिकारी दशरथ वाघमोडे, विस्तार अधिकारी ऋतुजा लेंडी व कृषी विस्तार अधिकारी किशोर चांदोरकर यांच्या सहकार्याने व यांच्या हस्ते गृहपयोगी भांडयांचे संच वाटप करण्यात आले.

## प्रकाश सोनवडेकर यांची फेरनिवड

**अलिबाग :** अलिबाग प्रेस असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्रकाश सोनवडेकर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. कार्याध्यक्षपदी राजन वेलकर, उपाध्यक्षपदी जितेंद्र शिगवण, सचिवपदी राजेश भोस्तेकर तर खजिनदारपदी हर्षद कशाळकर यांची बिनविरोध फेरनिवड करण्यात आली. अलिबाग प्रेस असोसिएशनची नवीन कार्यकारणी निवडणूक प्रक्रियेवेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून रायगड जिल्हा मराठी पत्रकारसंघाचे उपाध्यक्ष नागेश कुळकर्णी यांनी काम पाहिले. प्रत्येक पदासाठी एकेकच अर्ज आल्याने निवडणूक बिनविरोध झाली. प्रफुल्ल पवार, भारत रांजणकर, रमेश कांबळे, महेश पोरे, सुवर्णा दिवेकर, निखील म्हात्रे, समीर मालोदे, सचिन पावशे यांची कार्यकारीणी सदस्य म्हणून निवड करण्यात आली.


MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd. **e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-68/ 23-24 RFX 7000030878 | Supply of various General Asset budget for various substations under EHV (O&M) Division Panvel. | Rs. 10.89 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Tender Fee- Rs. 500/-+ GST Submission of bids up to 23.03.2024 up to 11:00 hrs, Opening date:-23.03.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 8530095666 E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd. **e-TENDER NOTICE –**

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFX | Description | Esti. Cost |
|---|---|---|
| Tend-2/ 24-25 7000030883 | Hiring of vehicle (LMV) for Incharge of Hot line Unit Kharghar under EHV (O&M) Circle, Panvel for the F.Y. 24-25 (LMV type Ertiga/ Sumo/ Scorpio/XUV 7 seater etc.) . **Tender Fee Rs. 500/- +GST** | Limited to Rs. 6.00 Lakhs |

EMD 1% of estimated cost. **Submission of bids from 15.03.2024 to 23.03.2024 up to 11:00 hrs, Opening date:-23.03.2024 @ 11:30 Hrs.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/**Contact Person: The Executive Engineer (Adm) Tel No. 022- 27459624, Mob. No. 8530095666.
E-mail ID se7200@mahatransco.in

**Sd/-**
**SUPERINTENDING ENGINEER EHV (O&M) CIRCLE, PANVEL**



MAHATRANSCO Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd. **E –TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender** specification. **Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :-7000030880 Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-21/ 2024-2025.** RFx E-tender for Providing of service for housekeeping, cleaning, sweeping and Garden Maintenance work at various Substation and offices under EHV (O&M) Division, Division Office Panvel for FY 2024-25. **Tender amount Rs. 23,40,817/-, EMD amount Rs. 23,408/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **15.03.2024, 18:00 Hrs. to 22.03.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 22.03.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **23.03.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER E.H.V. (O&M) DN. PANVEL**



MAHATRANSCO **E –TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification.Tender fees Rs.500/- + GST

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFxNo :- 7000030402 Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-72/ 2023-2024.** RFx e-tender for work of Painting of Power Transformer/ICT at various substations under EHV (O&M) Dn. Panvel**…2nd call. Tender amount Rs. 18,63,907/- , EMD amount Rs. 18,639/-** |
| 2 | Online Downloading theRFx | **15.03.2024, 18:00 Hrs. to 22.03.2024, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 22.03.2024 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **23.03.2024 at 11:00 hrs.(if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**EXECUTIVE ENGINEER, E.H.V.(O&M) DN. PANVEL.**


# श्रीवर्धनमध्ये पर्यटकांची संख्या रोडावली

## मुलांच्या परीक्षांमुळे फिरण्याचे प्लान लांबणीवर

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन बाजारपेठेमध्ये सध्या खूप मोठ्या प्रमाणावर मंदी असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. बारावीच्या परीक्षा संपल्या असल्या तरी दहावी बोर्डाच्या परीक्षा सुरू आहेत. त्यामुळे श्रीवर्धन तालुक्यात पर्यटकांची संख्या खूप मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे तसेच दुपारच्या वेळेनंतर जोरदार वारे सुटत असल्यामुळे मच्छीमारीचा हंगामदेखील अत्यंत कमी आहे. मुस्लिम धर्मीयांचा रमजान महिना सुरू झाला आहे, तर होळी सण येत्या आठ दिवसांत साजरा केला जाणार आहे.

दुपारच्या वेळेस श्रीवर्धन बाजारपेठेत अक्षरशः सन्नाटा असल्याचे पाहायला मिळते. श्रीवर्धन तालुक्यात दोनच व्यवसाय असे आहेत की, ज्यामुळे बाजारामध्ये तेजी असते. एक म्हणजे पर्यटन व्यवसाय व दुसरा मच्छीमारी. सध्या दोन्ही व्यवसाय ठप्प पडल्यामुळे बाजारपेठेत मोठ्या प्रमाणावर मंदी असल्याचे बोलले जात आहे. या मंदीचा फटका सामान्य व्यापाऱ्यांसह रिक्षाचालक, सहा आसनी रिक्षाचालक, समुद्रकिनाऱ्यावर खाद्यपदार्थांचे स्टॉल लावणारे दुकानदार, बाजारपेठेतील किराणा व्यापारी, त्याचप्रमाणे मिठाईचे व्यापारी, भाजी मार्केटमधील भाजी विक्रेते व फळे विक्रेते यांनादेखील या मंदीचा फटका बसत आहे.




Rayat Shikshan Sanstha's

**LOKNETE RAMSHETH THAKUR ENGLISH MEDIUM SCHOOL & JR. COLLEGE KAMOTHE**

Sector-6A, Plot No.40, Kamothe, Tal- Panvel Pin No. 410 209, Ph. No. 9867031232, Email Id :- kamotheemsrr@gmail.com



**STAFF RECRUITMENT 2024-2025**

| Sr. No. | Name of the Post | Qualification | No. of the post | S.C. 13.0% | S.T. 7.0% | N.T. A 3.0% | N.T. B 2.5% | N.T. C 3.5% | N.T. D 2.0% | S.B.C. 2.0% | O.B.C. 19.0% | EWS 10.0% | OPEN 38.0% | TOTAL 100% |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | **Supervisor** | Graduate / Post Graduate with B.Ed./M.Ed or equivalent from a recognised University. 5 years experience in School of which 2 years in Supervisor Position | 3 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 3 |
| 2 | **Pre-Primary Teachers** (Nursery to Sr.KG) | H.S.C/B.A/B.Sc./B.Com. and Montessori/E.C.C.Ed./ P.T.C. | 7 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 3 | 7 |
| 3 | **Primary Teachers** (STD- 1st to 5th) English, Hindi, Marathi, Maths, Science, SST, P.E., Art, Music, Computer | Graduate with D.Ed., B.Ed./M.Ed or equivalent from a recognised University. B.A. B.P.Ed./B.Sc. B.P.Ed./ B.Com. B.P.Ed., ATD / G.D. Art/BFA/ AM, B.A. / M.A., Sangeet Visharad, B.Sc. (IT/CS)/ M.Sc. (IT/CS)/ BCA/ MCA From a recognised University | 30 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 1 | 6 | 3 | 11 | 30 |
| 4 | **Secondary Teachers** (STD- 6th to 10th) English, Hindi, Marathi, Maths, Science, SST, Computer, Art, Music, P.E. | Graduate/ Post Graduate with B.Ed./M.Ed or equivalent from a recognised University. | 27 | 4 | 2 | 1 | 1 | 1 | 0 | 0 | 5 | 3 | 10 | 27 |
| 5 | **Higher Secondary Teachers** (STD - 11th to 12th) Economics, O.C., B. K., Biology, Chemistry & Physics, IT, English, Hindi, Marathi, Maths. | Graduate/ Post Graduate with B.Ed./M.Ed or equivalent from a recognised University. | 11 | 1 | 1 | 1 | 0 | 1 | 0 | 0 | 2 | 1 | 4 | 11 |
| | | TOTAL | 78 | 11 | 6 | 3 | 2 | 3 | 0 | 1 | 15 | 8 | 29 | 78 |

**Instructions:**
1) Candidates having excellent subject knowledge with professional degree only need to apply.
2) Application forms are available in school office from dt. **17-03-2024 to 05-04-2024 Time 10.00am. To 5.00pm Application form fee: Rs.100/-**
3) Last day to submit your CV, duly filled application form along with attested copy of your documents and cover letter in the office is **06-04-2024** up to 5.00 p.m. excluding holidays. Originals will be verified at the time of interview.
4) Application can be sent on **E-mail Id: kamotheemsrr@gmail.com** and the photocopy of the application along with application fee to be submitted to the office by hand on or before the due date .
5) Experienced Teachers in school will be given preference.
6) Decision of the selection committee would be final.

**Secretary**
**Rayat Shikshan Sanstha, Satara**

# नवी मुंबईत चिटफंड घोटाळा

## ३०० गुंतवणूकदारांची २६ कोटींची फसवणूक




**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शेती उत्पादनात गुंतवणूक करा महिना पाच टक्के नफा आणि ११ महिन्यांनी मूळ रक्कम परत. अशी आकर्षक जाहिरात करत एका कंपनीने एजंटद्वारे ३०० लोकांची २६ कोटींची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. याबाबत फिर्यादीने दिलेल्या तक्रार अर्जाची छाननी करत संबंधित आरोपींच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. याबाबत एपीएमसी पोलीस तपास करीत आहेत.

नितीन पार्टे, दीपक सुर्वे, अमोल जाधव सचिन भिसे असे यातील आरोपींची नावे असून या पैकी मुख्य आरोपी पार्टे, व अन्य दोघांना अटक करण्यात आली आहे तर एकाचा शोध सुरू आहे. नवी मुंबई पोलीस आयुक्तालय क्षेत्रातील उरण येथे काही महिन्यांपूर्वी कोट्यवधींचा चिटफंड घोटाळा समोर आला होता. या प्रकरणी स्वतः पोलिसांनी पुढाकार घेत कारवाई केली व आरोपींना गजाआड केले. आता अशाच प्रकारचा चिटफंड घोटाळा समोर आला आहे.

नितीन पार्टे संचालक असलेली रुद्रा ट्रेडर्स नावाची फर्म आहे. वाशीतील सर्वांत आलिशान व्यावसायिक संकुल म्हणून ओळख असलेल्या सतरा प्लाझा या ठिकाणी त्याचे कार्यालय आहे. मसाला आणि सुका मेवा याचबरोबर थेट शेतावर जाऊन शेतमाल खरेदी करत निर्यात करण्याचे काम ही फर्म करते, असे सर्वत्र भासवले जात होते. या शिवाय पार्टे हा लक्ष्मी प्रसाद को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी नावाच्या पतसंस्थेचा संचालकही आहे.

या दोन्हीच्या जीवावर पार्टे याने ३०० गुंतवणूकदारांची २६ कोटी रुपयांची फसवणूक केली. आम्ही थेट शेतात बांधावर जाऊन शेतमाल खरेदी करून निर्यात करतो, त्यामुळे नफा फार मोठा मिळतो. तुम्हीही गुंतवणूक करा. जेवढी गुंतवणूक त्याच्या पाच टक्के दर महिन्यात परतावा मिळणार तसेच गुंतवलेली मूळ रक्कम ११ महिन्यांनी मिळणार असे आमिष दाखवून पैसे घेतले जात होते.

हा व्यवहार पारदर्शक आहे हे भासवण्यासाठी लक्ष्मी प्रसाद को ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी या पतसंस्थेचे धनादेश, फिक्स डिपॉजिट बॉण्ड गुंतवणूकदारांना दिले जात होते. हा सर्व प्रकार मार्च २०२२ पासून सुरू होता, मात्र परताव्याचे पैसे मिळत नाहीत आणि ज्यांनी पैसे घेतले ते उडवा उडवीचे उत्तरे देतात त्यात मुख्य आरोपी पार्टे हा बहुतांश वेळेस देशाबाहेर असतो. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याची खात्री अनेकांना पटली. अखेर याबाबत काही दिवसांपूर्वी महेंद्र डेरे या गुंतवणूकदाराने एपीएमसी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

### प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची शक्यता

*या प्रकरणाची व्याप्ती वाढण्याची शक्यता असून गुंतवणूकदारांनी पुढाकार घेत एपीएमसी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन एपीएमसी पोलिसांनी केले आहे.*

याची तत्काळ दखल घेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक अजय शिंदे यांनी पथक नेमले. सहाय्यक पोलीस निरीक्षक अशोक दामले, पोलीस उपनिरीक्षक निलेश महाडिक यांच्यासह पथकाने अगोदर सर्व प्रकाराची शहानिशा केली. याबाबत आरोपींना गाफील ठेवण्यात आले आणि सर्व प्रकाराची खात्री पटल्यावर कारवाईसाठी सर्व कागदपत्रे जमा होताच गुरुवारी रात्री आरोपींना अटक केली आहे.

# मार्जिनल स्पेसचा गैरवापर करणाऱ्यांवर कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

शहरातील दुकानांसमोरील मोकळ्या जागा व्यावसायिकांनी व्यापल्या आहेत; त्यामुळे नागरिकांना ये-जा करताना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. सीबीडी बेलापूर सेक्टर ११ येथील परिसरात मार्जिनल स्पेसचा गैरवापर करणाऱ्या व्यवसायिकांवर महापालिकेच्या बेलापूर विभागाच्या वतीने शुक्रवारी (दि. १५)कारवाई करण्यात आली. धडक कारवाई करीत एकूण दोन ट्रक साहित्य जप्त केले.




सीबीडी बेलापूर येथील विंद्या कॉम्प्लेक्स इमारतीमध्ये स्टेशनरी तसेच झेरॉक्स दुकानासमोर खरेदीसाठी ग्राहकांची मोठी वर्दळ असते. या परिसरातील दुकानदारांनी दुकांनासमोरील मोकळ्या जागांवर अतिरिक्त व्यवसाय करण्याच्या अनुषंगाने विविध व्यवसाय थाटले आहेत. विंद्या कॉम्प्लेक्स या संकुलात दुकानदार मार्जिनल स्पेसचा गैरवापर करून या जागेत व्यवसाय करत असल्याने रहदारीला अडथळा निर्माण होत होता. याबाबत महापालिकेचे बेलापूर विभाग अधिकारी शशिकांत तांडेल यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या.

दरम्यान, तक्रारींच्या अनुषंगाने या परिसरातील १५ ते २० व्यवसायिकांवर कारवाई करण्यात आली. या कारवाईमध्ये दोन ट्रक साहित्य जप्त करण्यात आले. पालिकेच्या सुरक्षा रक्षकांच्या बंदोबस्तात ही कारवाई करण्यात आली. मार्जिनल स्पेसचा गैरवापर करणाऱ्यांवर, तसेच दुकानांसमोर आणि रस्त्यावर अनिधकृतपणे व्यवसाय करणाऱ्यांवर सातत्याने कारवाया केल्या जाणार असल्याचे तांडेल यांनी सांगितले.

## निवडक

### स्पा पार्लरवर पोलिसांची कारवाई

**पनवेल :** सीबीडी पोलीस ठाणे हद्दीतील सेक्टर १५ येथील वेलनेस स्पा या स्पा पार्लरवर कारवाई पोलिसांनी कारवाई केली आहे. या ठिकाणी मसाजच्या नावाखाली लज्जास्पद प्रकार चालत असलेबाबत गुप्त बातमदारामार्फत पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांना माहिती प्राप्त झाली. त्याअनुषंगाने सीबीडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक गिरीधर गोरे यांनी सहाय्यक निरीक्षक पराग लोंढे व पथक यांच्यामार्फत बनावट गिऱ्हाईक पाठवून छापा टाकला. या वेळी चार महिला व एक मॅनेजर अश्लील प्रकार करत असल्याचे आढळून आले. त्यांच्यावर गुन्हा दाखल करून कारवाई करण्यात आली आहे.

### आंबिवली येथे अखंड हरिनाम उत्सव



**मोहोपाडा :** आंबिवली येथे अखंड हरिनाम उत्सव, ज्ञानजप यज्ञ, हरिपाठ, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाची विठ्ठल रखुमाई मंदिर येथे दीपोत्सवाच्या माध्यमातून गुरुवारी (दि.१४) सांगता झाली. या वेळी गावातून पायी दिंडी काढण्यात आली. सोहळ्याचे ४१ वर्ष होते. जीवन जगत असताना सर्वांच्या गरजा वेगवेगळ्या असतात, मात्र आज माणसाच्या मनामध्ये भीती असून, चिंतेने माणूस खचत आहे. त्यामुळेच जीवनामध्ये धैर्य आणि भगवंताची कृपा असल्यामुळे हे सर्व शक्य होते, असे मार्गदर्शन हभप रामदास महाराज पाटील यांनी या वेळी केले.






उलवे नोड : येथील लोकनेते दि. बा. पाटील भुमिपूत्र भवनाचे लोकार्पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने झाले. माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी केलेल्या मागणीनुसार हे लोकनेते दि. बा. पाटील भूमिपुत्र भवन उभारण्यात आले आहे. या भवनाच्या लोकार्पणावेळी श्रीफळ वाढविण्याचा मान भाजपचे गव्हाण जि.प. विभागीय अध्यक्ष तथा वहाळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच अमर म्हात्रे यांना मिळाला. या सोहळ्यास भूमिपुत्र बांधव, भगिनी उपस्थित होते.

# नेरूळमध्ये विविध कामांचे भूमिपूजन आणि उद्घाटन

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

आदि जगद्गुरू श्री शंकराचार्य उद्यान सेक्टर २१ नेरूळ येथे स्थानिक विकास आमदार निधीमधून बसविण्यात आलेल्या स्टेनलेस स्टील बाकडे उद्घाटन व सोलर हायमास्ट भूमिपूजन आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते झाला.



नेरूळ सेक्टर-२१ येथे अदी जगद्गुरू श्री शंकराचार्य उद्यान विकसित करणे, रस्ते डांबरीकरण, रॉक गार्डन संरक्षण भिंत दुरुस्ती करणे, स्टेप गार्डनमध्ये खेळणी व ओपन जिम बसविणे, हावरे मॉल वं वेलनेस मेडिकल कॉर्नरला गटर बांधणे व साई श्रद्धा सोसायटी सामोरील गटर व पदपथ पुनर्बांधणी करणे अशा विविध विकास कामांचा भूमिपूजन करण्यात आले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, दिवाळे गाव स्मार्ट व्हिलेज झाल तस मी आता बेलापूर गावसुद्धा स्मार्ट करायला घेतले आहे.

या वेळी माजी नगरसेवक सुनिल पाटील, माजी नगरसेविका सरस्वती पाटील, माजी नगरसेविका अनिता शेट्टी, सुहासिनी नायडू, अशोक चटर्जी, डॉ. संजय पट्टीवार, तसेच जेष्ठ नागरिक उपस्थित होते.

## भाजलेल्या जखमांवर नवी मुंबईत मोफत उपचार

**नवी मुंबई : बातमीदार**

डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय आणि संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे यांच्या वतीने तसेच ऐरोली नॅशनल बर्न्स सेंटरच्या सहकार्याने आगीच्या घटनांमध्ये भाजलेल्या रुग्णांच्या जखमांवर उपचार तसेच मोफत सुधारात्मक शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन नवी मुंबईत करण्यात आले आहे.

मोफत शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन दि. ३० आणि ३१ मार्च २०२४ रोजी नॅशनल बर्न सेंटर, ऐरोली येथे होईल. या शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# अभिजित चौधरीची वैज्ञानिक झेप

## 'तारे जमीन पर'च्या संचालकपदी निवड



**ठाणे : रामप्रहर वृत्त**

शहापूर तालुक्यातील शेणवे गावचा रहिवासी असलेल्या अभिजित चौधरी या साहसी खेळाडूने आपल्या वैज्ञानिक संकल्पना व सृजनशीलतेच्या बळावर देशभर लोकप्रिय असलेल्या तारे जमीन पर या वैज्ञानिक संस्थेच्या संचालकपदापर्यंत झेप घेतली आहे. अभिजित चौधरी हा सानिका एजन्सीचे प्रवीण सूर्यराव यांचा भाचा आहे.

शेणवे या खेडेगावातील मराठी शाळेत शिक्षण घेणारा अभिजित चौधरी दहावीत प्रथम क्रमांक मिळवणारा हुशार विद्यार्थी. अभिजितने भौतिशास्त्रातील पदवी आणि एनसीसी आर्मी ट्रेनिंग पूर्ण केले. कुठल्याही व्यक्तीचे हुबेहूब स्केच काढण्यात अभिजितचा हातखंडा आहे. कलेच्या प्रांतात मुशाफिरी करत असताना अभिजित इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये भौतिकशास्त्र विषयाचा प्राध्यापक म्हणून आपली वैज्ञानिक आवडही जोपासत होता.

यादरम्यान 'तारे जमीन पर' वैज्ञानिक संस्थेच्या एका प्रोजेक्ट अंतर्गत मुंबई, नवी मुंबई व ठाणे महापालिकेच्या १३ शाळांमधे विज्ञान विषयावर मार्गदर्शन करण्याची संधी चालून आली आणि अभिजितने या संधीचे सोनेच केले. कोरोनाकाळात सर्व शैक्षणिक व अन्य कामे ठप्प झाल्याने अभिजित 'तारे जमीन पर'च्या इतर प्रोजेक्ट्ससाठी बंगलोर येथे स्थायिक झाला. आतापर्यंत तारे जमीन पर ने देशभरातील २३ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांना वैज्ञानिक प्रात्यक्षिके दाखवली आहेत.

### सर्व स्तरातून कौतुक

अभिजितने स्पार्क ऑफ क्युरिऑसिटी हा नाविन्यपूर्ण प्रोग्रॅम तयार केला. सायन्स किटचे वाटप, फिरते तारांगण, लेक्चर्स, क्विझ, इस्रो वैज्ञानिकांचे मार्गदर्शन अश्या अनेक नव्या गोष्टींचा समावेश या प्रकल्पात करण्यात आला. या सर्व नाविन्यपूर्ण व प्रामाणिक कामामुळेच अभिजितची तारे जमीन पर संस्थेचा ट्रस्टी म्हणून निवड घोषित झाली आहे. त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# सुधागडमध्ये अंगणवाड्यांचे सक्षमीकरण

*** अडीच हजार कुटुंबांना पोषण किटचे वाटप**
*** १५६ अंगणवाडी सेविकांसाठी आरोग्य निदान किट**

**पाली : प्रतिनिधी**

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड, एकात्मिक बाल विकास योजना आणि ईस्क्रा सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड विभागातील अंगणवाड्यांचे सक्षमीकरण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात आले आहेत. यामध्ये पोषण किट, आरोग्य निदान किट, मार्गदर्शन आदी विविध उपक्रमांचा समावेश आहे.



अंगणवाडी सक्षमीकरण कार्यक्रमात सर्वप्रथम १५६ अंगणवाडी सेविकांसाठी आरोग्य निदान किट याचे वाटप करण्यात आले. उपस्थित डॉक्टरांनी या किटचा वापर कसा करावा याबद्दल मार्गदर्शन केले. अंगणवाडी सेविकांची क्षमता बांधणी व्हावी या हेतूने वेगवेगळ्या विषयांचे मार्गदर्शन त्यांना करण्यात येत आहे. त्यामध्ये प्रामुख्याने मुलांचे पहिले हजार दिवस, स्तनपान, आणि वॉश कार्यक्रम याचा समावेश आहे.

या वेळी सुधागड तालुक्यातील सहा वर्षाच्या आतील मुले, गरोदर माता, स्तनदा माता यांच्यासाठी विशेष आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरास स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. स्वप्ना दाहे, बालरोगतज्ज्ञ डॉ. लेखराज तळमळे, डॉ. प्रकाश मोटे व न्यूट्रिशनिस्ट फाल्गुनी बोरकर उपस्थित होते. या उपक्रमात २००पेक्षा अधिक लोकांना मार्गदर्शन करण्यात आले. उपक्रमास गटविकास अधिकारी लता मोहिते, एकात्मिक बाल विकास योजना प्रकल्प अधिकारी रंजना म्हात्रे, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे सीएसआर प्रतिनिधी आदित्य सालेकर, इस्क्रा संस्थेचे अध्यक्ष अर्चना पाले आणि सचिव रामचंद्र आव्हाड उपस्थित होते.

सुधागड तालुक्यातील स्थलांतर लक्षात घेता पौष्टिक आहाराची जागृती लोकांमध्ये व्हावी या उद्देशाने व पोषण निर्देशांक वाढावा या हेतूने सुधागड तालुक्यातील २५०० कुटुंबांना पोषण किटचे वाटप करण्यात येणार आहे. या किटचे वितरण गरोदर माता, स्तनदा माता, सहा वर्षाच्या आतील मुले व सॅम व मॅम या कॅटेगरीतील मुले यांना करण्यात करण्यात असून उद्घाटन रंजना म्हात्रे यांच्या हस्ते झाले.

या संपूर्ण प्रकल्पासाठी भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडने आर्थिक सहाय्य करून सुधागडमधील अंगणवाडी सेविकांना सुदृढ करण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्याचसोबत १५६ वाडीतील २५०० कुटुंबांना पोषण किट वाटण्यात आले. त्यामुळे त्यांनी समाधान व्यक्त केले..

# कर्जतमध्ये आर्थिक साक्षरता केंद्र

### मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

**कर्जत : प्रतिनिधी**

भारतीय रिझर्व्ह बँक, बँक ऑफ इंडिया आणि स्वाधार फिनएक्सेस संस्थेच्या वतीने कर्जत तालुक्यात मनीवाईज आर्थिक साक्षरता केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या केंद्राद्वारे पनवेल आणि खालापूर तालुक्यातील ग्रामीण भागातसुद्धा आर्थिक जनजागृती करण्यात येणार आहे. यापूर्वी अन्य संस्थांच्या सहकार्याने अशी केंद्र सुरू करण्यात आली आहेत, परंतु स्वाधार संस्थेच्या वतीने महाराष्ट्रातील पहिले आर्थिक साक्षरता केंद्र ठरले आहे.



कर्जत शहरातील डेक्कन जिमखाना परिसरात मनीवाईज आर्थिक साक्षरता केंद्राच्या उद्घाटन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. बँक ऑफ इंडिया अग्रणी बँकेचे मुख्य व्यवस्थापक विजय कुलकर्णी यांच्या हस्ते फीत कापून व दीप प्रज्वलित करून केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास नवी मुंबई विभागीय अधिकारी पुलकित रस्तोगी, ग्राहक कक्षाचे विशेष अधिकारी दिलीप बडेकर, सुभाष खंडवाल, जांभिवली शाखेच्या व्यवस्थापिका स्नेहल हंडगर, मुख्य कार्यकारी अधिकारी अमृता कपूर, सीपीओ वैशाली खोकर, विभागीय व्यवस्थापक जमुना खत्री आदी उपस्थित होते.

शीतल पुजारी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. वैशाली खोकर यांनी प्रास्ताविकात बिहार, झारखंड आणि मध्यप्रदेशात १५४ साक्षरता केंद्र कार्यरत आहेत. महाराष्ट्रात २१ केंद्र सुरू करायची आहेत. त्यातील हे पहिले केंद्र कर्जतमध्ये सुरू होत आहे, असे सांगितले. विजय कुलकर्णी यांनी, कर्जतच्या ग्रामीण भागात आर्थिक व्यवस्थापन कसे करायचे? उतारवयात आर्थिक चणचण भासू नये म्हणून घ्यावयाची काळजी. डिजिटल बँक, विशेष करून महिलांनी पैशाची बचत कशी करायची? मुलांची शिक्षणे, कुटुंबातील सदस्यांची आजारपणे यासाठी आर्थिक व्यवस्थापन कसे करायचे? याबद्दलची सविस्तर माहिती या साक्षरता केंद्राकडून घेता येईल. यासाठी संस्थेच्या अधिकारी तालुक्यातील ग्रामीण व आदिवासी भागात जाऊन प्रबोधन करतील. त्यांना सहकार्य करा, असे आवाहन केले. दिलीप बडेकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# वरवठणे आदिवासीवाडीकडे जाणाऱ्या रस्त्याचे भूमिपूजन

### भाजप नेते किशोर म्हात्रे यांच्या प्रयत्नांना यश

**नागोठणे : प्रतिनिधी**

राज्याचे उद्योगमंत्री तथा रायगडचे पालकमंत्री उदय सामंत यांच्या सहकार्याने व भाजपचे माजी जिल्हा उपाध्यक्ष किशोर म्हात्रे यांच्या विशेष प्रयत्नाने वरवठणे आदिवासीवाडीकडे जाणाऱ्या रस्त्यासाठी आदिवासी विकास ठक्कर बाप्पा योजनेतून २० लाख रुपये निधी मंजूर झाल्यानंतर या रस्त्याचे भूमिपूजन गुरुवारी (दि.१४) मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.



रस्त्याच्या भूमिपूजन समारंभास म्हात्रे यांच्यासह भाजप युवा नेते प्रसाद भोईर, शिवसेनेचे युवा नेते मनोज खांडेकर, माजी सभापती गणपत म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्षा श्रेया कुंटे, भाजप रोहा तालुका सरचिटणीस आनंद लाड, महिला अध्यक्ष अपर्णा सुटे, पिगोंडे माजी उपसरपंच राजेंद्र लवटे, युवा नेते मोरेश्वर म्हात्रे, शेखर गोळे, तिरत पोलसानी, अशोक अहिरे, धनराज उमाळे, विठोबा माळी, ज्येष्ठ भाजप कार्यकर्ते डॉ.रोहिदास शेळके, हभप बापूमहाराज रावकर, नथुराम म्हात्रे, सागर शिर्के, राजेश पिंपळे, विकी म्हात्रे, विशाल म्हात्रे, किशोर नाईक, सुधीर भोय, मारुती राणे, पांडुरंग म्हात्रे, केदार कुंटे, दिनेश म्हात्रे, वरवठणे ग्रामपंचायत सदस्य बाबाजी पवार, हनुमान जोशी, जय म्हात्रे, सुखदा वाढावकर, सोनी पांडे, कविता म्हात्रे, वैशाली म्हात्रे, जयश्री जोशी, विकीता म्हात्रे आदी उपस्थित होते.

दरम्यान, वरवठणेतील तरुणांना व्यायामशाळेची गरज ओळखून सुप्रिम पेट्रोकेम लि.कडून व्यायामशाळेसाठी साहित्याची मागणी केल्यानंतर कंपनीचे वरिष्ठ अधिकारी आनंद वागळे यांनी सीएसआर फंडातून सात लाख रुपये मंजूर केले असून व्यायामशाळेचा दरवाजा, खिडकी व कलरचे काम स्वतःच्या खर्चाने करीत असून शरीरसौष्ठवपटू लीलाधर म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली व्यायाम साहित्य खरेदी करण्यात येणार आहे, असे म्हात्रे म्हणाले.

# बनावट आधार कार्ड, पॅन कार्ड बनवून कंपनीची लाखोंची फसवणूक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत शहरातील गृह प्रकल्पात सदनिका घेण्यासाठी बनावट आधार कार्ड आणि पॅन कार्ड बनवून त्याआधारे हौसिंग लोनची १८ लाख ४० हजारांची रक्कम लांबविण्याचा प्रकार कर्जत पोलीस ठाणे हद्दीत घडला. त्याबाबत टाटा कॅपिटल हौसिंग कंपनीच्या व्यवस्थापकाने आपली फसवणूक झाली असून न्यायालयात दाद मागितली. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने तिघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कर्जत दहिवली येथील कृष्णा हाईट्स राधे कृष्णा हाईट कॉम्प्लेक्समध्ये सदनिका घेण्यासाठी टाटा हौसिंग फायनान्स कंपनीकडे कर्ज घेण्यासाठी अंबरनाथ येथील सीताराम राजाराम मोरे आणि शिल्पा सीताराम मोरे यांनी आपली मिळकत गहाण ठेवून प्रयत्न सुरू केले. त्या वेळी मोरे दाम्पत्याने आपली बनावट आधार कार्ड आणि पॅन कार्ड यांच्या माध्यमातून टाटा कॅपिटल हौसिंग कंपनीकडे १८ लाख ४० हजारांचे कर्ज घेतले. त्यानंतर त्या कर्जाची रक्कम सुशीलकुमार रामस्वरूप सोनी याच्या अकाऊंटवर वर्ग केली.

मोरे दाम्पत्य आणि सोनी या तिघांनी संगनमत करून टाटा कॅपिटल कंपनीची कोणत्याही प्रकारची परवानगी न घेता फसवणूक केली आहे. त्याबाबत टाटा कॅपिटल कंपनीचे व्यवस्थापक वर्माश सहदेवन यांनी कर्जत न्यायालयात धाव घेतली होती. त्यानंतर न्यायालयाच्या आदेशाने सीताराम मोरे, शिल्पा मोरे आणि सुशील कुमार राम स्वरूप सोनी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत कर्जत पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुरेंद्र गर्द यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास उपनिरीक्षक सतीश शिंदे करीत आहेत.

# शून्य कचरा व्यवस्थापनासाठी चौक येथे घंटागाडी

**चौक : प्रतिनिधी**

माझी वसुंधरा अंतर्गत चौकमध्ये शून्य कचरा व्यवस्थापन आणि प्लास्टिक निर्मूलन करण्यासाठी घंटागाडीचा उपयोग करून ग्रुप ग्रामपंचायत चौक स्वच्छ करण्याच्या प्रयत्न आम्ही करू, असे आश्वासन सरपंच रितू ठोंबरे यांनी दिले.

ग्रुप ग्रामपंचायत चौक यांनी त्यांच्या १५व्या वित्त आयोग निधीतून संपूर्ण ग्रामपंचायत हद्दीतील कचरा गोळा करण्यासाठी नवीन घंटागाडी खरेदी केली. त्याचा लोकार्पण सोहळा भाजपचे उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्रामपंचायत प्रांगणात करण्यात आला. त्या वेळी सरपंच रितू ठोंबरे बोलत होत्या. या वेळी माजी जि. प. सदस्य मोतीराम ठोंबरे, उपसरपंच राजन गावडे, सुभाष पवार, निखिल मालुसरे, वृषाली आंबवणे, पुजा हातमोडे, ग्रामविकास अधिकारी एस. पी. जाधव, सुवर्णा राणे, स्वाती देशमुख, ॲड. रीना सोनटटके, अश्विनी म्हात्रे, लक्ष्मी वाघ, पिंट्या राणे, अजिंक्य देशमुख उपस्थित होते.




# माणगाव विठ्ठलनगरमध्ये मंदिर वर्धापन दिन सोहळा उत्साहात



**माणगाव : प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र विठ्ठलनगर गावी ११ ते १३ मार्चदरम्यान श्री स्वयंभू विठ्ठल रुखुमाई मंदिराचा वर्धापन दिन आणि अखंड हरिनाम सप्ताह उत्साहात झाला.

प्रतिवर्षीप्रमाणे यंदाही हभप गणेश महाराज नलावडे (आंबेवाडी), पुरोहित गिरीष श्रोत्री, सदानंद शिंदे, हभप नारायणमहाराज लाड, हभप सुनीलमहाराज भऊर यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा झाला. वर्धापन दिन व हरिनाम सप्ताहाचे हे १४वे वर्ष होते.

या सप्ताहानिमित्ताने श्री अभिषेक, सांस्कृतिक कार्यक्रम, रांगोळी प्रदर्शन, प्रवचन, कीर्तन, हरी जागर, श्री सत्यनारायण महापूजा, ज्ञानेश्वरी पारायण, पालखी मिरवणूक आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. पालखी सोहळ्यात ग्रामस्थ उत्साहात सहभागी झाले. सोहळ्याचे संपूर्ण नियोजन ग्रामस्थ मंडळींनी केले होते. गावातील घराघरात हरिनामाच्या गजरात पालखीचे स्वागत झाले.

महिला, मुले व ग्रामस्थांनी टाळ मृदुंगाच्या तालावर पालखी सोहळ्यात सहभागी होत झिम्मा फुगडी व पारंपरिक भजन गात सहभाग घेतला. तीन दिवस चाललेल्या या सोहळ्यात पंचक्रोशीतील भाविक, ग्रामस्थ व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. या नाम सप्ताहानिमित्त ग्रामस्वच्छता करण्यात आली तसेच रांगोळ्यांची सजावट करण्यात आली होती. ग्रामस्थ व भक्तगणांनी अन्नदानाची व्यवस्था केली.

## मार्चच्या मध्यात उष्णतेच्या झळा

**अलिबाग :** काही दिवसांपासून सुरू असलेल्या वातावरणातील बदलानंतर आता मार्च महिन्याच्या मध्यावर उष्णतेच्या झळा जाणवण्यास सुरुवात झाली आहे. वातावरणातील बदलाने साथीचे आजार बळावले आहेत.

# ब्राह्मण मंडळातर्फे रक्तदान शिबिर



**रोहे :** रोह्यात ब्राह्मण मंडळाच्या वतीने रविवारी (दि.१७) शासकीय रक्तकेंद्र अलिबाग यांच्या सहकार्याने श्री ओंकारेश्वर मंदिर येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरात सहभागी होऊन या सामाजिक उपक्रमात आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शिबिरासाठी अध्यक्ष अमित आठवले यांच्या नेतृत्वाखाली उपाध्यक्ष आनंद काळे, सचिव निखिल दाते, सहसचिव मकरंद गोविलकर, खजिनदार चैतन्य आठवले, सुहास फडके, विदुला परांजपे, नेहा आवळसकर आदींसह सर्व कमिटी सदस्य परिश्रम घेत आहेत.

# खोपोलीतील ‘आरे’ दूध डेअरी बंद

### जुन्या मशिनरी, भंगाराची विक्री

**खालापूर : प्रतिनिधी**

शासनाच्या खोपोली येथील आरे दूध डेअरीमधील काही मशीनरी व भंगाराची विक्री करण्यात आली असून ही दुध डेअरी फक्त वास्तूरुपात उभी आहे. इमारत पूर्ण जीर्ण झाल्याने कोसळण्याच्या स्थितीत उभी आहे. दै. रामप्रहरमध्ये याबाबत वृत्त प्रसिद्ध झाले होते.

रायगडात दूध व्यवसायाला घरघर लागल्याचे चित्र आहे. जिल्ह्यात १३४ दूध संस्थांसह दोन दूध संघांच्या केंद्राचे शटर मागील काही महिन्यांपासून बंद झाले आहेत. पनवेल व पेण तालुक्यातील प्रत्येकी एक असे दोन जिल्हा दूध संघ दिवाळखोरीत तर दूध संस्थानातील खालापुरातील पाच, रोहा आठ, अलिबाग पाच, उरण चार, पेण १०, पनवेल १९, कर्जत १५, सुधागड २०, मुरूड दोन, माणगाव १०, महाड २६, म्हसळा एक आणि पोलादरातील नऊ दूधसंस्था बंद झाल्या आहेत. जिल्ह्यात २१ दूध संस्थांपैकी कर्जत तीन, खालापूर एक, माणगाव एक, रोहा तीन, पाली सुधागड सात, पनवेल एक, पेण एक, अलिबाग दोन, महाड दोन अशा दूध संस्था सुरू असून फक्त नऊच संस्था संकलनात क्रियाशील आहेत.

खोपोली डेअरी कार्यक्षेत्रात उरण, पनवेल, कर्जत, खालापूर, पेण, अलिबाग, सुधागड असे सात तालुके समाविष्ट करण्यात आले होते. पाच दूध संकलन मार्ग मंजूर होते, मात्र दूध संकलन केंद्रात शेतकऱ्यांनी दूध देणेच बंद केल्याने या पाच संकलन केंद्रांबरोबरच महाड दूध डेअरी बंद झाली आहे.

याबाबत विभागीय आयुक्त कार्यालयातील दूध संकलन प्रभारी व्यवस्थापक व खोपोली डेअरी व्यवस्थापक राजू म्हात्रे यांना विचारणा केली असता, २० वर्षे जुन्या मशिनरी खराब झाल्याने त्या भंगारात काढण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. खोपोली दूध डेअरीमध्ये चसाच कामगार असून सध्या उत्पादन बंद असल्याने हजेरीवर आहेत, असे त्यांनी सांगितले. शासनाचा आरे दुध डेअरीबाबत काय निर्णय होतो याकडे लक्ष लागले आहे.



# मुरूडमध्ये व्यसनमुक्तीवर पथनाट्यातून जनजागृती

**मुरूड : प्रतिनिधी**

सर एस. ए. हायस्कूल व स्व. म. ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालय व मार्निंग स्टारप्रायमरीतर्फे इ. पहिली ते नववी व अकरावीच्या सर्व विद्यार्थ्यांनी विज्ञान सप्ताहानिमित्त आयोजित विज्ञान प्रदर्शन, वक्तृत्व स्पर्धा, समूहगीत स्पर्धेत उस्फूर्तपणे सहभाग घेतला होता. यामध्ये इ. नववी व इ. अकरावीच्या विद्यार्थांनी व्यसनमुक्तीवर आधारीत पथनाट्य सादर करून बाजारपेठ व राधा कृष्ण मंदिर कोळीवाडा येथे जनजागृती केली.



नागरिकांनीदेखील पथनाट्याचे कौतुक करीत उत्तम प्रतिसाद दिला. त्याआधी चोरघे सर यांनी शाळेत विविध चित्रे दाखवून रामन इफेक्ट अतिशय सोप्या भाषेत समजावून दिला. नोबेल पारितोषिक विजेते भारतरत्न शास्त्रज्ञ सी. व्ही. रमन यांनी संशोधन केलेल्या रमन इफेक्टमुळे मानवाला झालेले उपयोगदेखील विषद केले. शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे व पर्यवेक्षक सुनील गावडे यांनी या कार्यक्रमाचे उद्घाटन केले. पथनाट्य सादर करण्यासाठी राहूल वर्तक, संदेश चोरघे, महेंद्र घाटवळ, बालाजी घुगे, समिक्षा डोंगरीकर व दिपक पालशेतकर तसेच संचालक पांडुरंग आरेकर सर्व शिक्षकांचे सहकार्य लाभले.

# इन्स्पायर पुरस्काराने तिर्था जवके सन्मानित

**पाली : प्रतिनिधी**

रिलायन्स पेट्रोल केमिकल विद्यालय नागोठणे येथे इयत्ता आठवीच्या वर्गात शिकत असलेली विद्यार्थिनी तिर्था पंकज जवके हिला भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाकडून देण्यात येणारा इन्स्पायर पुरस्कार मिळाला आहे. जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन व प्रकल्प स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाल्याने आता तिची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



इन्स्पायर पुरस्कार अंतर्गत तिर्थाला प्रमाणपत्र व १० हजार रुपये पारितोषिक मिळाले आहे. सर्व स्तरांतून तिचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

# ‘आरसीबी’ची फायनलमध्ये धडक

## डब्ल्यूपीएलच्या उपांत्य सामन्यात मुंबईचा पराभव

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

डब्ल्यूपीएल अर्थात महिला प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने डिफेंडिंग चॅम्पियन मुंबई इंडियन्स संघाचा अवघ्या पाच धावांनी पराभव करीत अंतिम फेरी गाठली. एलिस पेरीच्या शानदार ६६ धावांच्या जोरावर प्रथम फलंदाजी करीत ६ बाद १३५ धावा केल्या. त्यानंतर २० षटकांत १३६ धावांचे मुंबईला दिलेले सर्वांत कमी लक्ष्याचा आरसीबी संघाने बचाव करीत ऐतिहासिक विजय नोंदवला.

आरसीबीकडून अनुभवी आशा शोभना अखेरचे षटक टाकत होती आणि तिने या षटकात सहा धावा देत एक विकेटही मिळवली, ज्यामुळे संघाला शानदार विजय मिळवला आला. विजयानंतर तिने केलेल्या सेलिब्रेशनने चाहत्यांना सूर्यकुमार यादवची आठवण करून दिली.

कर्णधार स्मृती मानधनाने आशा शोभनाला शेवटचे षटक टाकण्याची संधी दिली.



सामन्याच्या अखेरच्या षटकात मुंबई संघाला १२ धावांची गरज होती. आशाने किफायतशीर गोलंदाजी करत केवळ सहा धावा संघाला दिल्या आणि एकही मोठा शॉट मारण्याची संधी फलंदाजाला दिली नाही, तर तिच्या गोलंदाजीवर विकेटकिपर रिचा घोषने विस्फोटक फलंदाज सजना सजीवन हिला स्टंपिंग करीत बाद केले. शेवटच्या चेंडूवरही मुंबई संघाला एकच धाव घेता आली आणि आरसीबीचा संघ पहिल्यांदाच अंतिम फेरीत पोहचला.

तत्पूर्वी नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर आरसीबी संघाने एलिस पेरीच्या (६६) अर्धशतकाच्या जोरावर १३५ धावा केल्या. पेरीशिवाय आरसीबीच्या एकाही फलंदाजाला २० धावांचा पल्ला गाठता आला नाही, पण आरसीबीच्या डावाच्या शेवटच्या चेंडूवरील वेयरहमचा षटकार खूपच महत्त्वाचा ठरला. या धावसंख्येचा पाठलाग करण्यासाठी आलेला मुंबई संघ १८व्या षटकात हरमनप्रीत कौरची विकेट गमावेपर्यंत सामन्यात पुढे होता. हरमन आऊट होताच आरसीबीने या सामन्यात पकड घट्ट केली आणि मुंबईला १३० धावांवर रोखले. आता जेतेपदाच्या लढतीत आरसीबीचा सामना १७ मार्चला दिल्ली कॅपिटल्सशी होणार आहे.

### *आशा शोभनाच्या सेलिब्रेशनने वेधले लक्ष*

*सामन्यातील अखेरच्या चेंडूनंतर संघाने एकच जल्लोष केला, पण आशा शोभनाच्या सेलिब्रेशनने साऱ्यांचे लक्ष वेधले. तिने तिच्या ॲक्शनमधून ‘मी आहे इथे चिंता करू नको, असे सांगण्याचा प्रयत्न करीत होती. आयपीएल २०२०मधील मुंबई इंडियन्सविरुद्ध आरसीबीच्या एका सामन्यात सूर्यकुमार यादवने संघाला विजय मिळवून दिला होता, तेव्हा त्यानेसुद्धा असेच काहीसे सेलिब्रेशन केले होते. तिच्या या सेलिब्रेशनचा व्हिडीओ सोशल मिडियावर व्हायरल होत आहे.*

# आयसीसीचा आता स्टॉप क्लॉक नियम

## टी-२० वर्ल्डकपपासून होणार लागू

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) या वर्षी जून महिन्यात होणाऱ्या ट्वेंटी-२० वर्ल्डकपसाठी नवीन नियम आणला आहे. स्टॉप क्लॉक नियम आता १ जूनपासून सुरू होणाऱ्या आयसीसी ट्वेंटी-२० वर्ल्डकप स्पर्धेपासून सर्व प्रकारच्या आंतरराष्ट्रीय ट्वेंटी-२० व वनडे सामन्यांसाठी लागू होणार आहे.

चीफ एक्झिक्युटिव्हज कमिटेडने डिसेंबर २०२३ ते एप्रिल २०२४ या कालावधीत पुरुषांच्या वन डे आणि ट्वेंटी-२० क्रिकेटमध्ये चाचणी आधारावर स्टॉप क्लॉक नियम लागू करण्यास सहमती दर्शवली होती. षटकांदरम्यान लागणारा वेळ नियंत्रित करण्यासाठी घड्याळाचा वापर केला जाईल. जर गोलंदाजी संघ मागील षटक पूर्ण झाल्यानंतर ६० सेकंदात पुढील षटक टाकण्यास तयार नसेल आणि असे तीनवेळा झाल्यास त्या संघाला ५ धावांची पेनल्टी होईल.




क्षेत्ररक्षण करणारा कर्णधार एका षटकानंतर दुसऱ्या षटकासाठी जास्त वेळ घेतो. स्टॉप क्लॉक नियमानुसार आता असा विलंब करणाऱ्या संघाला दंड बसणार आहे. एक षटक संपल्यानंतर स्क्रीनवर ६० सेकंदांचा टायमर चालू होईल आणि त्याआधी दुसऱ्या षटकाची सुरुवात करावी लागेल.

६० सेकंदाचा कालावधी सुरू करण्याची जबाबदारी तिसऱ्या अम्पायरकडे असणार आहे. क्षेत्ररक्षण करणारा संघ गोलंदाजी करण्यास तयार असेल, परंतु फलंदाजी करणाऱ्या संघाकडून वेळकाढूपणा सुरू असेल, तर अम्पायर त्यांना ताकीद देतील.

**हे घड्याळ केव्हा बंद होईल?**

* दोन षटकांच्यामध्ये नवीन फलंदाज फलंदाजीला येत असेल तेव्हा
* अधिकृत ड्रिंक्स ब्रेक घेतला जाईल तेव्हा
* फलंदाज किंवा क्षेत्ररक्षक दुखापतग्रस्त होईल तेव्हा अम्पायरने त्याच्यावरील उपचाराला मान्यता दिली तेव्हा
* क्षेत्ररक्षण करणाऱ्या संघाची चूक नसताना वेळ वाया जाईल तेव्हा

# मॅथ्यू वेडची प्रथम श्रेणी क्रिकेटमधून निवृत्ती

**सिडनी : वृत्तसंस्था**

गुजरात टायटन्स आणि ऑस्ट्रेलियाचा स्टार यष्टिरक्षक-फलंदाज मॅथ्यू वेड याने शेफिल्ड शील्ड फायनलपूर्वी प्रथम श्रेणी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली आहे. तो तस्मानिया संघाकडून शेफिल्ड शील्ड फायनलमध्ये वेस्टर्न ऑस्ट्रेलियाविरुद्ध पुढील आठवड्यात पर्थ येथे शेवटचा सामना खेळणार आहे. दरम्यान, गुजरात टायटन्सच्या आयपीएल २०२४च्या मोसमातील सलामीच्या सामन्यात वेड खेळणार नाही.



२००७मध्ये वेडने प्रथम श्रेणी क्रिकेटला सुरुवात झाली आणि १६५ सामन्यांत त्याने ४०.८१च्या सरासरीने ९१८३ धावा केल्या आहेत. त्यात १९ शतके व ५४ अर्धशतकांचा समावेश आहे. यष्टिंमागे त्याने ४४२ झेल पकडले व २१ स्टम्पिंग केल्या आहेत. या कारकीर्दित त्याने दहा वर्ष व्हिक्टोरीया संघाचे प्रतिनिधित्व केले आणि शेफील्ड शील्डचे चार जेतेपदे जिंकली, त्यापैकी दोन जेतेपदं ही त्याच्या नेतृत्वाखाली आली. २०१७-१८मध्ये तो घरचा संघ तस्मानियाकडे परतला.

३६ वर्षीय वेडने ऑस्ट्रेलियाकडून ३६ कसोटी सामन्यांत १६१३ धावा केल्या आहेत. त्यात चार शतके असून २०१९च्या ॲशेस मालिकेत झळकावलेल्या दोन मॅच विनिंग शतकांचा समावेश आहे.

# माणगाव टीएमसी कॉलेजमध्ये क्रीडा स्पर्धा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव येथील जे.बी. सावंत एज्युकेशन सोसायटीच्या टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेज या ठिकाणी नेहरू युवा केंद्र अलिबागच्या सौजन्याने विविध खेळांचा समावेश असलेल्या क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेस विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी यांच्या हस्ते स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. १०० मीटर धावणे, भालाफेक, गोळाफेक, थाळीफेक आणि रस्सीखेच यासह विविध खेळ घेण्यात आले. प्रत्येक क्रीडा प्रकारातून प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी, मेडल आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले.




बक्षीस वितरण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालय विकास समितीचे सदस्य रामदास पुराणिक होते. रामदास पुराणिक, प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी, महाविद्यालयातील क्रीडा विभाग प्रमुख माळी तसेच नेहरू युवा केंद्राचे समन्वयक पराग पालपिनकर, सायली सुतार आणि महाविद्यालयातील क्रीडा विभागाचा उत्कृष्ट विद्यार्थी विराज खरस (टीवायबीकॉम) यांच्या हस्ते बक्षीस वितरण झाले.

स्पर्धा आयोजनात शिवकुमार राजू सिंग, रोहन वाढवळ, निशा तेटगुरे, सानिका शेडगे, अंकिता राऊत, नीतिशा अधिकारी, सलोनी अधिकारी, रिया नाडकर, यश पवार तसेच महाविद्यालयातील सेवक दिनेश कुळे आणि प्राध्यापक व कर्मचारीवृंद यांचे सहकार्य लाभले.

# वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ जाहीर

**अहमदनगर : प्रतिनिधी**

अहमदनगर येथील जिल्हा क्रीडा संकुल येथे २१ मार्चपासून होणाऱ्या ७०व्या वरिष्ठ पुरुष गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राने शुक्रवारी (दि.१५) आपला १२ जणांचा चमू जाहीर केला. ठाण्याच्या असलम इनामदार याच्याकडे संघाचे नेतृत्व सोपविण्यात आले असून नाशिकचा आकाश शिंदे या संघाच्या उपसंघनायक असेल.



अहमदनगर येथे डिसेंबर २०२२ साली झालेल्या ७०व्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून तसेच नुकत्याच ठाणे येथे झालेल्या २२व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक कबड्डी स्पर्धेतून हा २९ जणांचा संघ निवडण्यात आला. नगर येथे या सर्व निवडलेल्या खेळाडूंचा सराव शिबिर घेण्यात

### ठाण्याच्या असलम इनामदारकडे धुरा

येऊन त्यातून अखेर १२ जणांचा संघ जाहीर करण्यात आला. निवडण्यात आलेल्या या संघात विजेत्या मुंबई शहर आणि उपविजेत्या अहमदनगर संघाचे प्रत्येकी तीन खेळाडू असून ठाणे, नाशिक, रायगड, नांदेड, मुंबई उपनगर, रत्नागिरी या जिल्ह्याचे प्रत्येकी एक खेळाडू निवडले गेले आहेत.


हरियाणा येथील चरखी-दादरी येथे झालेल्या ६९व्या वरिष्ठ पुरुष गट कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राचा संघ भारतीय रेल्वेकडून पराभूत झाल्याने उपविजेता ठरला होता, तर जानेवारी २०१९ साली रायगडातील रोहा रायगड येथे झालेल्या ६६व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महाराष्ट्राने तृतीय क्रमांक प्राप्त केले होते. अर्जुन पुरस्कारप्राप्त खेळाडू शांताराम जाधव यांच्या कुशल मार्गदर्शनात हा संघ जेतेपद मिळविण्याच्या इराद्याने या स्पर्धेत उतरणार आहे. संघ निवड कागदावर तरी समतोल दिसत आहे. प्रत्यक्षात मैदानावर तो संघ कसा खेळतो यावर सर्व काही अवलंबून आहे.

संघ : असलम इनामदार संघनायक (ठाणे), आकाश शिंदे उपसंघनायक (नाशिक), संकेत सावंत, हर्ष लाड व प्रणय राणे (मुंबई शहर), आदित्य शिंदे, शुभम राऊत व शंकर गदई (अहमदनगर), मयूर कदम (रायगड), किरण मगर (नांदेड), अरकम शेख (मुंबई उपनगर), ओमकार कुंभार (रत्नागिरी), मुख्य प्रशिक्षक शांताराम जाधव, सहाय्यक प्रशिक्षक दादासो आवाड, व्यवस्थापक शंतनू पांडव.

## किशोर गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेसाठीही संघ घोषित; सोपान पुणेकरकडे नेतृत्व

**मुंबई :** बिहार मोतिहारी येथे १६ ते १९ मार्च या कालावधीत होणाऱ्या ३३व्या किशोर गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेकरिता महाराष्ट्राने शुक्रवारी (दि.१५) आपला संघ जाहीर केला. पिंपरी-चिंचवडच्या सोपान पुणेकर याच्या खांद्यावर संघाच्या नेतृत्वाची धुरा सोपविण्यात आली.

पुणे येथे झालेल्या जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतून हा संघ निवडण्यात आला.



या संघात पिंपरी-चिंचवड, बीड व नंदुरबार यांचे प्रत्येकी दोन खेळाडू असून मुंबई उपनगर(पूर्व), परभणी, पुणे(ग्रामीण), हिंगोली, पालघर, छत्रपती संभाजी नगर यांच्या प्रत्येकी एका खेळाडूची निवड करण्यात आली आहे. हा संघ बिहारला रवाना झाला असून १५ मार्चला तो स्पर्धेच्या ठिकाणी दाखल होईल.

संघ : सोपान पुणेकर-संघनायक व विशाल गाढवे (पिंपरी-चिंचवड), सूरज झगडे व परवेज शेख (बीड), रवींद्र माने व ऋतिक जाधव (नंदुरबार), दीपक शिंदे (मुंबई उपनगर), प्रदीप जाधव (परभणी), अथर्व सोनावणे (पुणे ग्रामीण), समीर शेख (हिंगोली), धीरज सरोज (पालघर), शुभम गवळी (छत्रपती संभाजीनगर), प्रशिक्षक रवींद्र ढगे, व्यवस्थापक दिनेश चाकणकर.




# रसायनीत सायक्लोथॉन व मॅरेथॉन स्पर्धा

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बिर्ला कार्बन इंडिया प्रा.लि., पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट तसेच पिल्लेज कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय रसायनी यांच्या संयुक्त विद्यमाने सायक्लोथॉन व मॅरेथॉन स्पर्धा शनिवारी (दि.१६) सिद्धेश्वरी कॉर्नर ते लोहोप गावापर्यंत आयोजित करण्यात आली होती.

विजयी खेळाडूंना पारितोषिक, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी बिर्ला कार्बन कंपनीचे प्लांट हेड रवींद्र रघुवंशी, एचआर मॅनेजर निखिल भामरे, पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष अरुण जाधव, रोटरी क्लब ऑफ पाताळगंगाच्या अध्यक्ष रेश्मा कुरूप, शिक्षिका कलावती उपाध्याय, लक्ष्मण मोरे, अनिता मॅडम, निलेश जाधव, किशोर पाटील, विजय शिंदे, रोहित इंगळे, हरेश जाधव, रोहिदास शिवले, पिल्लेज महाविद्यालयातील शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

दरम्यान, कैरे, बोरिवली, वाशीवली, वडगाव, तळवली, वाणिवली, लोहोप, इसांबे, माजगाव, आंबिवली या गावांमध्ये प्लास्टिकबंदी जनजागृतीवर नागरिकांना मार्गदर्शन करून राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थिनींनी घरोघरी जाऊन कापडी बॅग वाटप केल्या.

# कोण जिंकणार ऑरेंज आणि पर्पल कॅप?

## आजी माजी खेळाडूंनी वर्तविला अंदाज

**मुंबई : प्रतिनिधी**

आयपीएलचा आगामी सतरावा हंगाम २२ मार्चपासून खेळवला जात आहे. सर्वच संघ तयारीला लागले असून खेळाडू आपापल्या संघांसोबत जोडले जात आहेत. आयपीएल हंगामाबद्दल चर्चा करण्यासाठी आजी माजी खेळाडूंची ‘स्टार स्पोर्ट्स’वर मैफिल रंगली. या कार्यक्रमात स्टार खेळाडू स्टीव्ह स्मिथ, अंबाती रायुडू, डेल स्टेन, इरफान पठाण सहभागी झाले होते. या वेळी त्यांना माध्यमांच्या प्रतिनिधिंनी आयपीएल २०२४मध्ये ऑरेंज कॅप आणि पर्पल कॅपचा मानकरी कोण असेल यावर दिग्गजांचे मत जाणून घेतले.



ऑरेंज कॅप आणि पर्पल कॅप कोण जिंकणार याबद्दल प्रत्येकाने वेगवेगळे मत मांडले. ऑरेंज कॅपसाठी स्टीव्ह स्मिथने ऋतुराज गायकवाड, अंबाती रायुडूने यशस्वी जैस्वाल, डेल स्टेनने विराट कोहली, तर इरफान पठाणने विराट कोहली किंवा यशस्वी जैस्वाल दावेदार आहे, असे म्हटले.

पर्पल कॅप डेल स्टेनच्या मते भुवनेश्वर कुमार, स्टीव्ह स्मिथच्या अंदाजानुसार मिचेल स्टार्क, अंबाती रायुडूच्या पसंतीनुसार राशिद खान, तर इरफान पठाणच्या म्हणण्यानुसार कुलदीप यादव जिंकेल, असे म्हटले.

# सरहद शौर्याथॉनच्या लोगो, वेबसाईटचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते अनावरण

**मुंबई : प्रतिनिधी**

सरहद पुणे आणि भारतीय लष्कर यांच्या संयुक्त विद्यमाने आणि अर्हम संस्था पुणेच्या सहकार्याने सरहद शौर्याथॉन २०२४ मॅरेथॉनचे आयोजन ३० जून २०२४ रोजी झोजिला वॉर मेमोरियल ते कारगिल वॉर मेमोरियल या दरम्यान करण्यात येणार आहे. या स्पर्धेचा लोगो आणि संकेतस्थळाचे अनावरण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते वर्षा शासकीय निवासस्थानी करण्यात आले. या वेळी क्रीडा व युवक कल्याणमंत्री संजय बनसोडे, राज्य उत्पादन शुल्कमंत्री शंभूराज देसाई उपस्थित होते.



भारतीय लष्कराच्या वतीने प्रथमच झोजिला युद्ध विजय अमृत महोत्सव आणि कारगिल युद्ध विजय रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सरहद शौर्याथॉन २०२४ (मॅरेथॉन)चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत भारतासह जगातील विविध देशातील धावपटू भाग घेणार आहेत.

गेली सहा वर्षे सरहदच्या वतीने कारगिल आंतरराष्ट्रीय मॅरेथॉनचे आयोजन यशस्वीपणे कारगिल येथे केले आहे. त्यासाठी भारतीय लष्कराने सरहद संस्थेला या स्पर्धेचे आयोजन करण्यास आमंत्रित केले आहे. स्पर्धेत पुरुष आणि महिलांसाठी ४४ किमी, २५ किमी, १० आणि ७.५ किमी अंतराच्या स्पर्धा तसेच शालेय आणि महाविद्यालय विद्यार्थ्यांसाठी चार किमीची स्पर्धा घेतली जाईल. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिके दिली जाणार आहेत.

या वेळी सरहद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संजय नहार, स्पर्धेचे अर्हम संस्थेचे अध्यक्ष आणि मुख्य समन्वयक डॉ. शैलेश पगारीया, स्पर्धा संचालक सुमंत वाईकर, तांत्रिक संचालक वसंत गोखले सरहदचे सुयोग गुंदेचा, रामदास खोपडे, अजित निबांळकर, संतोष बालवडकर, स्वयंम पगारीया उपस्थित होते. या स्पर्धेचे मुख्य मार्गदर्शक मेजर जनरल सचिन मलिक (लडाख मुख्यालय) आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com